७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. १४ मे २०२६

www.dainikesandhya.com  www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये


# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे अनावरण

**मुंबई (दै. संध्या)**

नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांना एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, 'मायगव्ह' आणि 'असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या.

सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. 18 ते 24 वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.

- हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरांवर आधारित आहे.
- भगवान शंकराचे त्रिशूळ: आध्यात्मिक उर्जेचे प्रतीक.
- त्र्यंबकेश्वर मंदिर: प्रादेशिक वारशाचे दर्शन घडवणारी मंदिराची प्रतिकृती.
- काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदी: गोदावरी नदीला 'शिवलिंगा'च्या रूपात दर्शविण्यात आले असून, ते कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते.

## डॉलरच्या तुलनेत रुपया सर्वकालीन नीचांकी पातळीवर

**मुंबई (दै. संध्या)**

13 मे रोजी रुपया डॉलरच्या तुलनेत 25 पैशांनी घसरून 95.75 च्या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. यापूर्वी मंगळवारीही रुपया 95.50 च्या सर्वकालीन नीचांकी पातळीवर पोहोचला होता. गेल्या काही दिवसांपासून रुपयामध्ये सातत्याने घसरण सुरू आहे. 2026 च्या सुरुवातीपासूनच रुपया दबावाखाली आहे. गेल्या वर्षी डिसेंबर 2025 मध्ये रुपया प्रथमच 90 च्या पातळीच्या पुढे गेला होता. यामुळे महागाई वाढण्याचा धोका वाढला आहे. रुपयाच्या घसरणीचे मोठे कारण म्हणजे अमेरिका-इराण युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढणे. 28 फेब्रुवारी रोजी युद्ध सुरू झाल्यापासून ब्रेंट क्रूडच्या किमती सुमारे 50% पर्यंत वाढल्या आहेत, ज्यामुळे रुपयाच्या मूल्यात 5% पेक्षा जास्त घट झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतच्या संघर्षविरामाला (सीजफायर) कमकुवत ठरवल्याने आखाती देशांमध्ये तणाव वाढला आहे. युद्ध किंवा संघर्षाच्या शक्यतेमुळे गुंतवणूकदार उदयोन्मुख बाजारातून (उदा. भारत) आपले



■ १ डॉलरची किंमत ९५.७४ रुपये, यामुळे महागाई वाढण्याचा धोका

पैसे काढून सुरक्षित गुंतवणुकीकडे वळत आहेत. इराणमधील संकटामुळे जागतिक बाजारात पुरवठ्यात अडथळा येण्याची भीती आहे. याच कारणामुळे ब्रेंट क्रूड तेलाच्या किमती 105 डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेल्या आहेत. भारत आपल्या गरजेच्या सुमारे 80% तेल आयात करतो, ज्यामुळे तेल महाग झाल्यावर डॉलरची मागणी वाढते आणि रुपया कमकुवत होतो. जेव्हा कच्च्या तेलाचे दर वाढतात, तेव्हा भारताचे आयात बिल म्हणजेच इंपोर्ट बिल देखील वाढते. यामुळे देशाची 'चालू खाते तूट' (CAD) वाढण्याची शक्यता असते, ज्यामुळे थेट रुपयाचे मूल्य कमी होते.

## ब्रेकिंग न्यूज

### मंत्र्यांची ईव्ही खरेदीची चमकोगिरी

मुंबई (दै. संध्या) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराचे आवाहन केल्यानंतर, राज्यातील मंत्री आणि सत्ताधारी आमदार आपल्या कामकाज आणि दौऱ्यासाठी इलेक्ट्रिक वाहने खरेदी करत आहेत. यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे नेते आदित्य ठाकरे यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. "आमच्या सरकारने २०२१ मध्ये आणलेले ई-वाहन धोरण या सरकारने बासनात गुंडाळले असून, आता केवळ प्रसिद्धीसाठी आणि 'फोटो सेशन'साठी मंत्री आणि आमदारांकडून ई-वाहने खरेदी केली जात आहेत," असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे. आदित्य ठाकरे म्हणाले की, "२०२१ मध्ये आमच्या सरकारने महाविकास आघाडीच्या काळात एक महत्त्वाकांक्षी ई-वाहन धोरण जाहीर केले होते. या धोरणानुसार, २०२२ पासून सर्व मंत्री, सर्व सरकारी विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना नवीन गाड्या खरेदी करायच्या असल्यास किंवा भाड्याने घ्यायच्या असल्यास केवळ इलेक्ट्रिक वाहनेच घेण्याचे बंधनकारक करण्यात आले होते.

## माझा गुन्ह्याशी काहीही संबंध नाही

### आंदोलनावेळी मी नाशिकला होतो : राज ठाकरे

**ठाणे (दै. संध्या)**

2008 सालच्या रेल्वे भरती आंदोलनाप्रकरणी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्याच्या सुनावणीसाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे आज ठाणे न्यायालयात हजर झाले होते. यावेळी राज ठाकरेंसह या प्रकरणातील इतर सहा आरोपींचीही उपस्थिती होती. सुनावणीदरम्यान राज ठाकरे यांचा जबाब नोंदवण्यात आला, ज्यामध्ये त्यांनी 'या गुन्ह्याशी माझा कोणताही संबंध नाही' असे न्यायालयात स्पष्ट केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी 18 मे 2026 रोजी होणार असून, पुढच्या तारखेला राज ठाकरेंना प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहण्याची आवश्यकता नसल्याची माहिती त्यांच्या वकिलांनी दिली आहे. सन 2008 मधील रेल्वे भरती प्रक्रियेदरम्यान मराठी तरुणांच्या नोकऱ्या परप्रांतीयांनी हिरावल्या, असा आरोप करत मनसे कार्यकर्त्यांनी कल्याण स्थानकावर उत्तर भारतीय उमेदवारांना केलेली मारहाण आणि रेल्वेच्या मालमत्तेच्या नुकसानीप्रकरणी आज न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडली. या आंदोलनादरम्यान परप्रांतीयांना



लक्ष्य करणे आणि हिंसाचाराला प्रोत्साहन दिल्याचा ठपका ठेवत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह एकूण 7 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता, ज्या संदर्भात आज न्यायालयीन कामकाज झाले. आंदोलन प्रकरणात राज ठाकरे सोडून इतर मनसे कार्यकर्त्यांवर जे आरोप आहेत, त्याबद्दल न्यायाधीशांनी जबाब वाचून दाखवले. उत्तर भारतीय परिक्षार्थींना मनसे कार्यकर्त्यांनी लाठ्या-काठ्याने मारहाण केली, या मारहाणीत परिक्षार्थींना मार लागला, ते जखमी जाले होते, असे न्यायाधीशांनी जबाबात वाचून दाखवले. त्यानंतर साक्षीदारांचेही जबाब वाचून दाखवण्यात आले. त्यानंतर राज ठाकरे यांनी न्यायालयात स्पष्ट केले की या गुन्ह्याशी माझा काहीही संबंध नाही. आंदोलनावेळी मी नाशिकला होतो, असे ठाकरेंनी स्पष्ट केले आहे.

# पुणे महापालिकेत निधी वाटपात भेदभाव

### सुनेत्रा पवारांचे देवेंद्र फडणवीसांना पत्र; 'सबका साथ, सबका विकास'ची करून दिली आठवण

**मुंबई (दै. संध्या)**

पुणे महानगरपालिकेच्या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात निधी वाटपावरून महायुतीमधील मित्रपक्षांमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. सत्ताधारी भाजपच्या नगरसेवकांना राष्ट्रवादीच्या तुलनेत अधिक निधी मिळाल्याचे समोर आल्यानंतर, राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केली आहे. सुनेत्रा पवार यांनी 'सबका साथ, सबका विकास'ची आठवण करून देत, "शहराचा विकास करताना कोणत्याही एका भागाला किंवा गटाला झुकते माप देऊ नका," असे आवाहन त्यांनी या पत्रातून केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे महानगरपालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात सत्ताधारी भाजपच्या प्रत्येक नगरसेवकाला विकासासाठी ७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याउलट, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांना प्रत्येकी ५ कोटी रुपयांचा निधी दिला गेला आहे. महायुतीचे सरकार असतानाही अशा



प्रकारे दोन कोटींची तफावत ठेवल्याने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली होती. हीच बाब लक्षात घेऊन सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून समान निधी वाटपाची मागणी केली आहे.

सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात 'महायुती'च्या धर्माची आठवण करून दिली आहे. त्यांनी नमूद केले की, "आज आपण राज्य आणि केंद्र स्तरावर महायुती म्हणून एकत्र काम करत आहोत. अशा परिस्थितीत शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सत्ताधारी आणि मित्रपक्षांच्या सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन निधीचे वाटप करणे आवश्यक आहे. पाणीपुरवठा, ड्रेनेज लाईन, रस्ते विकास आणि पथदिवे यांसारख्या मूलभूत गरजा राजकीय पक्षांच्या




सीमांपलीकडे आहेत."

कोणत्याही एका प्रभागाला अधिक निधी आणि दुसऱ्याला कमी निधी मिळाल्यास, संबंधित भागातील नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित राहू शकतात, अशी भीती सुनेत्रा पवारांनी व्यक्त केली आहे. "सबका साथ, सबका विकास" या ध्येयानुसार भाजप आणि राष्ट्रवादीच्या सर्व नगरसेवकांना, माजी नगरसेवकांना तसेच लोकप्रतिनिधींना त्यांच्या प्रभागासाठी समान निधी वाटप व्हावा, यासाठी संबंधित प्रशासनाला योग्य ते निर्देश द्यावेत, अशी विनंती त्यांनी या पत्राद्वारे केली आहे.

### १ जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे मोफत

# खासगी ट्रॅव्हल्सची लूट थांबणार!

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यात खासगी प्रवासी बस वाहतुकीदारांकडून केली जाणारी बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाईल ॲप्सद्वारे प्रवाशांची होणारी आर्थिक पिळवणूक याबाबत गेल्या अनेक दिवसांपासून प्रवाशांकडून तक्रारी येत आहेत. याबाबत आता शासनाने गंभीर दखल घेतली आहे. तसेच या बैठकीत 1 जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकावरील स्वच्छतागृहे मोफत करण्याचा निर्णयही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. या संदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तसेच दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी सह परिवहन आयुक्त आणि सुराज्य अभियानातील तीन प्रतिनिधींचा समावेश असलेली विशेष समिती गठित करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश मंत्रालयात आयोजित बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर तसेच सुराज्य अभियान संघटनेचे अभिषेक मुरुकटे, अरविंद पानसरे, सुनील हनवट आदी उपस्थित होते. गठित समिती खासगी



बसच्या भाडेवाढीवर नियंत्रण मिळवणे, अवैध बुकिंग ॲप्सना आळा घालणे आणि प्रवाशांच्या तक्रारींवर प्रभावी उपाययोजना सुचविणे याबाबत सविस्तर अहवाल सादर करेल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीचे आयोजन करण्यात येईल. समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची राज्य सरकारकडून प्रभावी आणि तातडीने अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन सरनाईक यांनी दिले आहेत.

प्रताप सरनाईक म्हणाले, सध्या अनेक खासगी ट्रॅव्हल्स कंपन्या अनधिकृत ॲप्सच्या माध्यमातून प्रवाशांचे बुकिंग करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असून सण-उत्सव किंवा सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा तिकीट दर आकारले जातात. प्रवाशांची आर्थिक लूट करणाऱ्या अशा प्रवासी बस वाहतूकदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत प्रवाशांची लूट खपवून घेतली जाणार नाही.

राज्यातील बसस्थानकांवरील संपर्क यंत्रणा अधिक सक्षम आणि प्रभावी करणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी प्रत्येक बसस्थानकावर प्रवासी सुविधांसाठी संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. तसेच, परिवहन विभागाने नावे बदललेल्या गावांबाबत आणि व्याकरणदृष्ट्या अचूक मराठी भाषेचा वापर करण्याबाबत परिपत्रक जारी करावे व त्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश प्रताप सरनाईक यांनी दिले.

राज्यातील एसटी बस आणि बसस्थानकांच्या अस्वच्छतेबाबत प्रवाशांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत असून बसस्थानकांचा कायापालट करण्यासाठी आणि कायमस्वरूपी स्वच्छता राखण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येत आहेत. 1 जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे मोफत करण्यात येणार असून, प्रवाशांना उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. आज मंत्रालयात विविध महत्त्वपूर्ण बैठका पार पडल्या. प्रत्येक चर्चेत जनहिताचा केंद्रबिंदू कायम ठेवण्यात आला. एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी मोफत प्रवास पासचा कालावधी 12 महिन्यांचा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. हा निर्णय त्यांच्या आयुष्यभराच्या सेवेला दिलेला योग्य सन्मान आहे. या निर्णयाचे स्वागत करत संघर्ष महाराष्ट्र एसटी सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेतर्फे माझा सत्कार करण्यात आला. हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी असून, भविष्यातही जनहितासाठी अधिक जबाबदारीने कार्य करण्याची ऊर्जा देणारा आहे.




## संपादकीय

# चांगल्यातले वाईट आणि वाईटातले चांगले शोधण्याचे कौशल्य आहे?

मानवी वर्तन किंवा आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना फारच कमी वेळा पूर्णपणे चांगले किंवा पूर्णपणे वाईट यामध्ये विभागता येतात. बहुतांश वेळा आपले वास्तव चांगले आणि वाईट यांच्या विविध टक्केवारीच्या मिश्रणातून बनत असते. अशा परिस्थितीमध्ये आपल्याला 'चांगल्यामधले वाईट काय आहे?' आणि 'वाईटामध्ये त्यातल्या त्यात चांगले काय आहे?' हे वेगळे करण्याचे कौशल्य अत्यंत आवश्यक आहे. वर्तमान कालखंडात बहुतांश गोष्टींविषयी दोन धृवांसारख्या वेगवेगळ्या टोकाच्या भूमिका घेण्याकडे लोकांचा कल वाढलेला आहे. 'पोलरायजेशन' हे प्रमुख राजकीय हत्यार म्हणून वापरले जाते आहे. नागरिकांनी 'टोकाचे चांगले' किंवा 'टोकाचे वाईट' अशा भूमिका घेऊन एकमेकांशी हिरीरीने भांडावे त्यामुळे मग राज्यकर्त्यांना आपला स्वार्थ सहज साधता येऊ शकेल अशा स्वरूपाचे हे राजकारण आहे. या राजकारणाला जर आपल्याला बळी पडायचे नसेल तर आपल्याला चांगल्यामधले वाईट आणि वाईटातले चांगले शोधता आले पाहिजे. कधी कधी वाईट गोष्ट चांगुलपणाच्या आड लपलेली असते. आपल्याला आवडणारे बोलणे, मदत करण्याची आश्वासने यांच्या मागे अनेक वेळा समोरच्या व्यक्तीचा वेगळाच स्वार्थ दडलेला असतो. फक्त बाह्य चमक पाहून निर्णय न घेता, सत्य आणि परिणाम समजून घेतले तर चांगल्या गोष्टींमधील वाईट ओळखता येते. तसेच ज्या गोष्टीमध्ये खूप चांगले असते, त्यामधले थोडेसे वाईट लगेच दिसत नाही. ते शोधण्यासाठी शांतपणे आणि विचारपूर्वक निरीक्षण करणे गरजेचे असते.

छोट्या चुका किंवा गैरफायदे दुर्लक्षित न करता त्याकडे लक्ष दिले, तर चांगल्या गोष्टीमधील वाईट सहज ओळखता येते. चांगल्या गोष्टींमधले वाईट समजून घेण्याची आपली क्षमता विकसित झाली तर मग कोणाही व्यक्तीचे दैवतीकरण आपल्याकडून होण्याची शक्यता कमी होते. वाईट गोष्टीमध्येही काही शिकण्यासारखे किंवा चांगले दडलेले असू शकते. कठीण प्रसंग माणसाला अधिक मजबूत, सावध आणि समजूतदार बनवतात. अपयशातून अनुभव मिळतो, चुका सुधारण्याची संधी मिळते आणि योग्य मार्ग निवडण्याची जाणीव होते. एक उदाहरण पाहूया. अलीकडे भारतात विविध राजकीय पक्षांनी निवडणुकांच्या काळात मोठ्या प्रमाणावर मोफत योजना, सवलती आणि आर्थिक मदतीची आश्वासने दिली. या गोष्टीतील चांगला भाग असा की गरीब, शेतकरी, महिला आणि बेरोजगार लोकांना काही प्रमाणात आधार मिळतो. अनेक लोकांना शिक्षण, आरोग्य आणि प्रवासाच्या सुविधा मिळतात. पण त्यामधले वाईट असे की काही वेळा लोकांच्या खऱ्या समस्या सोडविण्यापेक्षा फक्त मते मिळविण्यासाठी अशा घोषणा केल्या जातात. त्यामुळे लोक दीर्घकालीन विकास, रोजगार, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे कमी लक्ष देतात. सरकारवर आर्थिक ताणही वाढू शकतो. कोणतीही राजकीय गोष्ट



पूर्णपणे चांगली किंवा पूर्णपणे वाईट नसते. आपण फक्त आकर्षक घोषणा न पाहता, त्याचे परिणाम, उद्देश आणि समाजावर होणारा प्रभाव समजून घेतला पाहिजे. विवेकबुद्धीने विचार केला तर चांगल्यामधले वाईट आणि वाईटामधले चांगले ओळखता येते. आपण स्वत:, आपले कुटुंब आणि आपला समाज अधिक चांगला होण्यासाठी हे अतिशय आवश्यक कौशल्य आहे.

## संस्कृत सुभाषित

छायामन्यस्य कुर्वान्ति तिष्ठान्ति स्वयमातपे ।
फलनि च परार्थाय वृक्षः सत्पुरुषाः दूव ।।

अर्थ – सत्पुरुषांचाच गुण वृक्षामध्ये असल्याने स्वत: उन्हात उभे राहून वृक्ष दुसऱ्यांना सावली देतात. त्यांची फळेदेखील दुसऱ्यासाठीच असतात. म्हणून वृक्ष हे सज्जनाप्रमाणेच होत.

## गुरु वचन

### पंचायतीचा निर्णय

एकदा एक हंस आणि हंसिणी हरिद्वारच्या सुरम्य वातावरणातून भटकत उजाड, निर्जन आणि वाळवंटात आले. हंसिणी हंसाला म्हणाली की, आपण कोणत्या भागात आलो आहोत? इथे तर पाणी नाही, जंगल आणि थंड हवादेखील नाही. इथे तर आपले जगणे कठीण होईल. भटकताना सायंकाळ झाली तेव्हा हंसाने हंसिणीला म्हटले की, आजची रात्र कशी तरी घालवू या. आपण सकाळी हरिद्वारला परतू या!

रात्र झाली तेव्हा झाडाखाली हंस आणि हंसिणी थांबले होते त्या झाडावर एक घुबड बसले होते.ते जोराने ओरडू लागले. हंसिणीने हंसाला विचारले अरे इथे तर रात्री झोपू शकत नाही. हे घुबड ओरडत आहे. हंसाने पुन्हा हंसिणीची समजूत काढली की, कशी तरी रात्र घालवू या.आता मला कळले की हा प्रदेश ओसाड आहे.असे घुबड ज्या भागात राहतील तो तर विराण आणि ओसाड राहीलच. झाडावर बसलेले घुबड दोघांचे बोलणे ऐकत होते. सकाळ झाली तेव्हा घुबड खाली आले आणि त्याने म्हटले की, हंसभाऊ माझ्यामुळे रात्री तुम्हाला खूप त्रास झाला मला माफ कर. हंस म्हणाला, काही हरकत नाही, तुझे आभार!

असे म्हणून हंस आपल्या हंसिणीला घेऊन जसाच पुढे निघाला तेव्हा मागून घुबड ओरडले, अरे हंसा माझ्या पत्नीला घेऊन कुठे चाललास? हंस चपापला त्याने म्हटले तुझी पत्नी? अरे , ही हंसिणी आहे, माझी पत्नी आहे. माझ्यासोबत आली होती, माझ्यासोबत जात आहे.

घुबड म्हणाले, चूप बस, ही माझी पत्नी आहे.दोघांचा वाद वाढला. सर्व लोक गोळा झाले. अनेक गावातील जनता बसली. पंचायत बोलावण्यात आली. पंच लोकही आले. त्यांनी विचारले, कशाचा वाद आहे? लोकांनी सांगितले घुबडाचे म्हणणे आहे की, हंसिणी त्याची पत्नी आहे आणि हंस म्हणतोय हंसिणी त्याची पत्नी आहे!

दीर्घ बैठक आणि पंचायतीनंतर पंच बाजूला झाले आणि म्हणाले की, हंसिणी हंसाची पत्नी आहे, ही गोष्ट खरी आहे. मात्र हंस आणि हंसिणी तर आता थोड्यावेळात या गावातून निघून जातील. आमच्यात तर फक्त घुबडच राहील. त्यामुळे निर्णय घुबडाच्या बाजूनेच द्यायचा आहे. मग पंचांनी आपला फैसला सुनावला आणि म्हटले की, सर्व तथ्य आणि पुरावे तपासल्यानंतर ही पंचायत या निष्कर्षावर येते की, हंसिणीची घुबडाची पत्नी आहे आणि हंसाला ताबडतोब गाव सोडून जाण्याचा आदेश देते.

हे ऐकताच हंस हैराण झाला आणि रडू लागला. पंचायतने चुकीचा निर्णय दिला असे ओरडू लागला. घुबडाने माझी पत्नी घेतली! रडत ओरडत तो निघाला तेव्हा घुबडाने त्याला हाक मारली. ऐ मित्र हंस, थांब ! हंसाने रडतच विचारले बाबा आता आणखी काय करणार आहेस? पत्नी तर तू घेतलीच आहेतस. आता काय जीव घेणार?

घुबड म्हणाले, नाही मित्रा, ही हंसिणी तुझी पत्नी होती आणि आहे! मात्र काल रात्री जेव्हा मी ओरडत होतो तेव्हा तू तुझ्या पत्नीला म्हणाला होतास की, हा प्रदेश विराण आणि ओसाड आहे कारण इथे घुबड राहतो! मित्रा,हा प्रदेश विराण आणि ओसाड तो इथे घुबड राहता म्हणून नाही तर, इथे असे पंच राहतात जे घुबडाच्या बाजूने निर्णय देतात.

स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतरही आपल्या देशाच्या दुर्दशेचे मूळ कारण बहुधा हेच आहे की, आपण आपला निर्णय घुबडांच्या बाजूने सुनावला आहे. त्याला आपणच जबाबदार आहोत.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:तैतिल ११:२०:४८ |
| १४ मे २०२६ | करण:गर २२:००:३८ |
| गुरवार | सूर्य:मेष |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:मेष२२:३३:४० |
| वैशाख शके | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्– १९४८ | मुस्लिम मास – जिल्काद |
| संवत्सर –पराभवनाम | तारीख – २७ |
| अयन– उत्तरायणारंभ | विशेष |
| मास– वैशाख | प्रदोष |
| ऋतु– सौर ग्रीष्म | जनार्दनस्वामी पुण्यतिथी |
| कृष्ण पक्ष | – काटोल व नागपूर |
| तिथि:द्वादशी ११:२०:४८ | धर्मवीर छत्रपती |
| नक्षत्र:रेवती २२:३३:४० | संभाजी महाराज जयंती |
| योग:प्रीति १७:५२:५९ | (तारेखप्रमाणे) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १४८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | | | | | 2 | 8 | |
| 3 | | | 2 | 5 | 6 | | | 9 |
| 2 | 6 | 7 | | | 9 | | | |
| | | 4 | 1 | | | 3 | 7 | |
| 8 | 5 | | | | | | 2 | 4 |
| | 3 | 6 | | | 4 | 1 | | |
| | | | 4 | | | 9 | 5 | 2 |
| 1 | | | 3 | 8 | 5 | | | 7 |
| | 7 | 5 | | | | | 3 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १४७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7 | 3 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | 8 |
| 9 | 2 | 8 | 4 | 7 | 5 | 3 | 6 | 1 |
| 5 | 4 | 6 | 3 | 1 | 8 | 7 | 2 | 9 |
| 8 | 9 | 1 | 2 | 6 | 7 | 5 | 4 | 3 |
| 7 | 6 | 4 | 5 | 3 | 9 | 8 | 1 | 2 |
| 3 | 5 | 2 | 8 | 4 | 1 | 6 | 9 | 7 |
| 2 | 3 | 9 | 6 | 8 | 4 | 1 | 7 | 5 |
| 4 | 8 | 7 | 1 | 5 | 2 | 9 | 3 | 6 |
| 6 | 1 | 5 | 7 | 9 | 3 | 2 | 8 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७०२ – इंग्लंड आणि नेदरलंडने फ्रांस आणि स्पेनविरुद्ध युद्धाची घोषणी केली.
- १९६२ – ग्रीसची राजकुमारी सोफिया हिनी स्पेनच्या डॉन जुअन कार्लोस सोबत विवाह केला.
- १९६३ – कुवेत युनायटेड नेशनच्या १११वा सदस्य बनला.
- १९७३ – स्कायलॅबने पहिला अंतरिक्ष केंद्र सुरु केले.
- २००६ – ब्राझीलमध्ये गुंडाच्या टोळीने पोलिसांवरील केलेल्या हल्ल्यात ३० जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- २००७ – कपिल देव यांची इंडियन क्रिकेट लिग (आयसीएल)च्या अध्यक्षपदी निवड झाली.

### जन्म

- १६५७ – छत्रपती संभाजी महाराजाचा जन्म.
- १६८६ – थेरोमेटरच्या शोधक जर्मनीचा गेब्रील डॅनियल फहरेनहीट याचा जन्म.
- १७१० – स्वीडनचा राजा अडॉल्फ फ्रीड्रीकचा जन्म.
- १९४८ – इंग्लिश क्रिकेट खेळाडू, मार्गदर्शक, प्रशिक्षक बॉब वूल्मरचा जन्म.
- १९५५ – तलत अझीझ, गझल गायकाचा जन्म.

### निधन

- १९२३ – अखिल भारतीय काँग्रेसच्या मूळ संस्थापकांपैकी एक, कायदेपंडित व समाजसुधारक नारायण गणेश चंदावरकर यांचे निधन.
- १९६३ – वैदिक, संस्कृत, तिबेटी, चिनी, मंगोलियन इत्यादी भाषांचे जाणकार आणि कोशकार डॉ. रघुवीर यांचे निधन.
- २००१ – गाईड, मालगुडी डेज या कादंबऱ्यांचे लेखक आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कादंबरीकार पद्मभूषण आर. के. नारायण यांचे निधन.

## : SMS :

Mandir mein jaap
karta hoon
Masjid mein adaab
karta hoon
Insaan se kahin
bhagwan na
ban jaun
Isliye roz tujhko
SMS karke paap
karta hoon.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.९ | २९.२ |
| अहमदनगर | ४० | २८.८ |
| अकोला | ४४ | ३१.३ |
| अमरावती | ४३.७ | ३१.२ |
| बीड | ४६.२ | ३२.४ |
| भंडारा | ४४.९ | ३१.४ |
| बुलढाणा | ३९.९ | २५.७ |
| चंद्रपूर | ४७ | ३२.६ |
| चेन्नई | ४०.२ | ३२.१ |
| नवी दिल्ली | ४० | २९.१ |
| धुळे | ४३.७ | ३०.४ |
| गोंदिया | ४३ | ३०.१ |
| जळगाव | ४५.४ | ३१.२ |
| कोल्हापूर | ३९.७ | २४.९ |
| लातूर | ४०.५ | २९.४ |
| मुंबई | ४१.५ | ३६.९ |
| नागपूर | ४३ | ३२.२ |
| नांदेड | ४३.५ | ३०.६ |
| नंदूरबार | ४१.१ | ३१ |
| नाशिक | ४०.१ | २६.३ |
| पुणे | ३७.६ | २६.२ |
| पंढरपूर | ४१.५ | ३०.५ |
| सातारा | ३९.८ | २३.९ |
| सांगली | ४०.४ | २५.९ |
| सोलापूर | ४१.३ | ३१.८ |
| वर्धा | ४४.६ | ३२.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा: पश्चिम व्यावसायीक किंवा कौटुंबिक समस्यांचे समाधान होईल.

**तूळ :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: उत्तर विचार पूर्वक काम केल्यास आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण वेळेवर निर्णय न घेतल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. धार्मिक भावना वाढीस लागेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:उत्तर आर्थिक स्थिती मजबूत होईल. मुलांच्या आरोग्याची चिंता मिटणार आहे.

**मिथून :** शुभ रंग: केसरी ,शुभ दिशा: पश्चिम व्यापारात अडचणी निर्माण होतील. त्यामुळे आजचा दिवस धावपळीत जाणार आहे.

**धनू :** शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: उत्तर वरिष्ठ लोकांमध्ये मान सन्मान मिळेल. बुद्धी चातुर्यामुळे कामात यश मिळेल. नवीन गुंतवणूक करण्याचे योग आहेत.

**कर्क :** शुभ रंग :पांढरा,शुभ दिशा:उत्तर अडकलेली कामे पूर्ण होण्याचे योग आहेत. मान प्रतिष्ठा सन्मान मिळणार आहे. जोखमीच्या कामापासून दूर रहा.

**मकर :** शुभ रंग: लाल,शुभ दिशा: दक्षिण व्यवहारा कुशलतेमुळे आधिकारी वर्गाकडून स्तुती होईल. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.


**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर नवीन योजना कार्यान्वयीत होईल. आर्थिक आवक वाढेल. फायदा मिळण्याची परिस्थिती निर्माण होईल.

**कुंभ :** शुभ रंग :निळा, शुभ दिशा :पश्चिम आपल्या बुद्धी चातुर्याने समस्या दूर होतील. सुख समृध्दीत वाढ होईल. उतावळेपणा करू नका. वाचनाची गोडी वाढेल.

**कन्या :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : उत्तर व्यवसायात यश मिळेल. दूरदर्शीपणामुळे अनेक अडचणींना व्यवस्थीत हाताळाल.

**मीन :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम मित्र, शुभचिंतकाची भेट होईल. आई वडिलांच्या प्रकृतीची काळजी घ्या. गृहपयोगी वस्तू खरेदी करण्याचे योग आहेत.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १४८



**आडवे शब्द**
१. हाती घेतलेले काम पूर्ण करा, या अर्थाचा सुविचार
७. हिशोबाची वही
११. चेष्टा
१२. क्रिकेटमधील धाव
१३. बोटावरील आवरण
१४. ठोक! हाण!
१५. ललाट
१६. कौतुक (ग्रामीण)
१८. वय लपवणारा रंग
१९. सरहद्द
२०. पुष्कळ
२२. हालणे, बाजूला होणे
२३. संगीतातील लकेर
२४. मोळी, गवताची पेंडी
२५. घरोब्याचे
२७. मालक
२८. वसवलेली वस्ती
३०. सोज्वळ, प्रामाणिक
३२. रत्न
३४. चकचकीत, स्वच्छ
३७. पोपट
३८. बेहिशोबी, पुष्कळ
४१. खांदा, खांद्याचे हाड
४१अ. लटकवणे, चिकटवणे
४२. लोखंड घासण्याचे हत्यार
४३. पद्धतीनुसार
४४. अग्नी
४७. अवधान, लक्ष
४८. बेताचे गरम
४९. छिद्रातून, खिडकीतून पडणारे ऊन
५०. नंतर
५१. गुच्छाने आलेले
५२.. उत्तराधिकारी
५४. योग्यता, लायकी
५६. युद्ध
५८. सांगणे
५९. किंमत
६०. अर्धी ओंजळ
६२. दोन्ही बाजूने घातक शस्त्र
६३. छोटा, बारीक
६६. साखरेचा रस
६८. वाढलेला व्याप
६९. हिंदीत पर्यंत, मराठीत प्रतीक्षा
७१. देवांचा राजा
७२. गुप्त रस्ता
७४. निर्धन
७६. बातमी
७८. डोंगर
७९. खबदाड
८०. चटकन, त्वरित

**उभे शब्द**
१. बाजार
२. धनुष्यबाण
३. बडबडी, लोचट स्त्री
४. सरस, नीरस अशी भावना
५. विद्यापीठातील विभागप्रमुख
६. न्यायासंबंधी
८. वडील
९. खुंटी
१०. शिजवताना पदार्थ जळणे
१४. धनी-धनीण
१७. अंधार
१८. हात
१९. राम-रावण युद्धाला कारणीभूत ठरलेले रावणाचे कृत्य
२१. चांगले वाईट
२२. दक्षकन्या
२६. गुरे राखणारा
२७. श्रीमंत
२९. समशेर
३१. संपुष्टात येणे
३३. आईचा भाऊ
३५. दुष्ट
३६. त्वरित, लगेच
३९. घोड्यांच्या शर्यतीची जागा (इंग्रजी)
४०. धोबी
४१. अफूचे बी
४२. कानात सांगितलेला सल्ला
४४. ब्रेड
४५. समुद्रातील अग्नी
४९. एकदम नवीन
५०. भिस्त
५०अ. फळातील खाद्य
५१. काळजी, चिंता
५३. घर
५४. झाडाची पाने, काड्या इ.
५५. ज्वर, दाह
५७. मुघल वास्तुकलेचे वैशिष्ट्य
६१. भेग, चीर, पोकळ जागा
६२. सकाळी बारानंतरची वेळ
६४. चलनवलन
६५. चंद्राची कड
६७. टॅक्स (मराठी)
७०. वाळवी
७३. मांजरीचा भाचा
७४. स्थिती, दशा
७५. बगळा
७७. आवाज, ध्वनी

### जम्बो शब्दकोडे क्र. १४७ चे उत्तर

आडवे उत्तर १.एकी हेच बळ ६.हाटक १०.करवा ११.अमावस्या १२.पसायदान १४.लवा १५.कबरस्तान १६.बरवा १७.सावज १८.अदबशीर २१.स्तवन २३.कोठार २५.परीक्षा २७.सन २८.वाळवंट २९.दरबार ३०.लहानसहान ३२.कबर ३३.तहान ३५.नम्रता ३७.सतरंजी ३९.क्षपणक ४१.सहाण ४२.गीतकार ४४.मीनकेतन ४७.फसगत ४९.ईश्वर ५०.पारध ५२.समाधीट ५३.तळ ५५.रतन ५७.गपगार ५९.करा ६१.दहा ६३.रीतभात ६६.तळतळाट ६७.रातोरात ६१.रवाना ७२.डाका ७३.खंत ७४.कर्जबाजारी ७५.रयत

उभे उत्तर : १.एकलव्य २.कीरवा ३.हेवा ४.बजबजपुरी ५.समान ६.हास्यस्पद ७.कपबशी ८.गायब ९.वानवा ११.अस्ताव्यस्त १३.दारवठा १५.कव १८.अननस १९.बलवान २०.अंबर २२.वसन २३.कोटकल्याण २४.रखरख २५.परत २६.क्षालन २९.दफनभूमी ३१.हारजीत ३४.साक्षर ३६.तारकेश्वर ३७.सणवार ३८.रंगीत ४०.कलागत ४१.सन ४३.कारभार ४५.नई ४६.तरतरीत ४७.फटकळ ४८.तळपट ५१.धग ५२.सगा ५४.सदरा ५६.नत ५८.पट ६०.रातसार ६२.हातोडा ६४.भारत ६५.तवा ६६.तयारी ६८.राका ७०.नाक ७१.बाबा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण नियामक मंडळ व वार्षिक सर्वसाधारण बैठक संपन्न

■ प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीने पूर्ण करा : मंत्री अतुल सावे

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सौर सयंत्र प्राधान्याने पूर्ण करावे तसेच प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीने पूर्ण करावेत. याशिवाय सामाजिक उत्तर दायित्व निधीद्वारे सौर प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश अपारंपरिक ऊर्जा मंत्री तथा महाऊर्जाचे अध्यक्ष अतुल सावे यांनी दिले. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) नियामक मंडळाची १०८ वी तसेच ३१ वी वार्षिक सर्वसाधारण बैठक आज पुणे येथील महाऊर्जा भवन येते पार पडली. यावेळी राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, महाऊर्जा महासंचालक ओमप्रकाश बकोरिया, अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर व सर्व विभागांचे महाव्यवस्थापक , उपसंचालक लेखा व इतर अधिकारी उपस्थित होते. श्री. सावे यांनी पीएम कुसुम योजनेमधील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कॉल सेंटर सुरू करावे. सध्याच्या इंधन टंचाईवर मात करण्यासाठी विभागाच्या सर्व इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची सूचना दिल्या. यावेळी महाऊर्जा कार्यालयात नव्याने नियुक्त झालेल्या प्रकल्प अधिकारी व लेखापाल यांना मंत्री श्री. सावे व श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.



### आठवड्यातून एक दिवस 'सार्वजनिक वाहतूक दिन' पाळण्याचा महापौरांचा प्रस्ताव

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी वर्गाने आठवड्यातून किमान एक दिवस खाजगी वाहनांचा वापर टाळून सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, असा महत्त्वपूर्ण प्रस्ताव महापौर मा. सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांनी मांडला आहे. यासंदर्भात त्यांनी मा. आयुक्त यांना अधिकृत पत्र पाठविले आहे. जागतिक पातळीवर इंधनाशी संबंधित निर्माण होणाऱ्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि सार्वजनिक वाहतुकीच्या वापराबाबत केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून हा उपक्रम राबविण्याची गरज महापौरांनी व्यक्त केली आहे. तसेच, राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनीही शहरांमधील वाहतूक सुलभतेसाठी मेट्रोसारख्या सार्वजनिक प्रकल्पांच्या वापरावर दिलेल्या भराचा उल्लेख यावेळी करण्यात आला आहे. महापौरांनी नमूद केले की, प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी स्वतः सार्वजनिक वाहतुकीचा वापर करत असल्यास सर्वसामान्य नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश जाईल. तसेच, प्रत्यक्ष प्रवास करताना येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्यासाठी प्रशासनाला अधिक प्रभावीपणे काम करता येईल. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी तसेच इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि शहरातील वाहतूक व्यवस्थेवर ताण कमी करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याची विनंती महापौरांनी केली आहे.

### इंधन बचतीसाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर हेच 'राष्ट्रकर्तव्य' : डॉ. हुलगेश चलवादी



पुणे (दैनिक संध्या) : जागतिक स्तरावर निर्माण झालेले इंधन संकट आणि भू-राजकीय तणावामुळे विस्कळीत झालेली पुरवठा साखळी या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री मा.ना.रामदास आठवले साहेबांनी मुंबई मेट्रो-३ (एक्वा लाईन) ने विधानभवन ते धारावी असा प्रवास करीत सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचा आदर्श घालून दिला, असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले.इंधन बचतीसाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर हेच 'राष्ट्रकर्तव्य' असल्याचे मत यानिमित्ताने त्यांनी व्यक्त केले. इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल युद्धांमुळे कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडत असतांना खाजगी वाहनांचा मोह टाळून मेट्रोसारख्या जागतिक दर्जाच्या सुविधेचा वापर करणे ही काळाची गरज आहे. अप्रत्यक्षरित्या देशाचे परकीय चलन वाचण्यास त्यामुळे मदत होईल. इंधन बचत, सोने खरेदी टाळण्याचे पंतप्रधानांच्या आवाहनामुळे देशाचे परकीय चलन वाचून अर्थव्यवस्था मजबूत होईल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि नैसर्गिक शेतीचा अवलंब करून नागरिकांनी 'विकसित भारत' घडवण्यासाठी शिस्तबद्ध जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन डॉ.चलवादी यांनी केले. भारतासाख्या विशाल लोकसंख्या असलेल्या देशात अशाप्रकारचे निर्णय घेतांना सर्वसामान्यांना याच्या झळा बसणार नाही, याची काळजी घेण्याचे कर्तव्य देखील केंद्र-राज्य सरकारांना पार पाडावे लागेल.देशातील अनेक राज्यांची लोकसंख्या ही जगातील इतर देशांएवढी आहे. अशात सरकारने शिस्तबद्ध कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे.सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे आवाहन करतांना मेट्रो आणि बसचे तिकीट दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात असावेत. यासोबतच 'ग्रीन एनर्जी'चा पर्यायी व्यवस्थेला चालणा देण्याच्या धोरणाला वेग देण्याची आवश्यकता आहे.'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' अधिक मजबूत करावी. इंधन संकटामुळे मालवाहतूक महागणार असेल तर, सरकारने जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष सवलती द्याव्यात, असे आवाहन देखील डॉ.चलवादी यांनी केले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर या आवाहनाचा नकारात्मक प्रभाव पडणार नाही, याची विशेष काळजी सरकारला घेणे आवश्यक आहे. शेती तसेच शेतीपुरक जोडधंद्यात इंधनाचा वापर अत्यंत महत्वाचा आहे. अशात कुठल्याही धोरणांचा, निर्णयांचा फटका गरिबांना विशेषतः शोषित-वंचित-पीडित-उपेक्षितांना बसू नये. सर्वसामान्यांना आर्थिक कोंडीतून बाहेर काढण्यासाठी सरकारने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणखी भक्कम करावी आणि पर्यायी ऊर्जा स्त्रोतांना प्रोत्साहन द्यावे, असे डॉ.चलवादी म्हणाले.

### चारचाकी वाहनांच्या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांकरिता फेसलेस सुविधा

पुणे (दैनिक संध्या) : चारचाकी खासगी वाहनाकरिता एमएच १२-झेड एस या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क भरुन आरक्षित करण्याकरिता १४ मे, २०२६ रोजी दुपारी ४ वाजल्यापासून फेसलेस सुविधा सुरु होणार आहे; ऑफलाईन पद्धतीने पसंती क्रमांक शुल्क स्वीकारले जाणार नाहीत, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे. पसंती क्रमांक आरक्षीत करण्याकरिता https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावर, नाव व आधार संलग्नित मोबाईल क्रमांक टाकून नाव नोंदणी करावी व त्यानंतर अर्ज व शुल्क भरणा करून पसंती क्रमांक आरक्षित करता येईल, असेही कळविले आहे.

# रात्र शाळेतील विद्यार्थ्यांचा संघर्ष प्रेरणादायी : महापौर मंजुषा नागपुरे

## पुण्यातील विद्यार्थ्यांनी राज्यात प्रथम-द्वितीय येत शहराच्या शिरपेचात रोवला मानाचा तुरा

पुणे (दै. संध्या)

"रात्र शाळा ही अतिशय गरजेची आणि समाजासाठी महत्त्वाची शिक्षण व्यवस्था आहे. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून राज्यात अव्वल येणाऱ्या या विद्यार्थ्यांचा संघर्ष खरोखर प्रेरणादायी आहे. माझे पती देखील रात्र महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले आहेत. त्यामुळे अशा शिक्षण व्यवस्थेचे महत्त्व अधिक अधोरेखित होते," असे गौरवोद्गार पुणे महानगरपालिकेच्या महापौर मा. सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांनी काढले. दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी संचलित आबासाहेब अत्रे रात्र प्रशालेतील दहावी परीक्षेत राज्यात प्रथम व द्वितीय



क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा महापौर मॅडम यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करत त्यांच्या जिद्दीचे कौतुक केले.

विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहराच्या शिरपेचात पुन्हा एक मानाचा तुरा रोवणारी ही कामगिरी ठरली आहे. रात्र शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत घवघवीत यश संपादन केले आहे.

दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी संचलित आबासाहेब अत्रे रात्र प्रशालेचा यंदाचा दहावीचा निकाल ८८.८८ टक्के लागला आहे. वसुप्रद वैभव कुलकर्णी यांनी ९०.४० टक्के गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर अंकुश काशिनाथ रेवाळे यांनी ८४.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला.

संघर्षातून यश मिळविणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या कथा प्रेरणादायी आहेत. वसुप्रद कुलकर्णी यांनी वेदपाठशाळेतील शिक्षण, पौरोहित्याचे काम आणि रात्री अभ्यास करत यश मिळवले. तर अंकुश रेवाळे यांनी दिवसा सुरक्षा रक्षक व बाऊन्सर म्हणून काम करत, कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत आणि अत्यंत कठीण परिस्थितीत अभ्यास करून हे यश संपादन केले.

यावेळी महापौर मॅडम यांनी पुणे महानगरपालिकेतील ज्या कर्मचाऱ्यांचे शिक्षण अर्धवट राहिले आहे, त्यांनी इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी अशा रात्र प्रशालांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमास दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष श्री. संजीव महाजन, सदस्य श्री. भारत वेदपाठक, ज्येष्ठ शिक्षक श्री. संजय सातपुते, श्री. कुंभार आदी उपस्थित होते.

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. संजीव महाजन यांनी संस्था शताब्दी वर्षात पदार्पण करत असताना हे यश महत्त्वाचे असल्याचे सांगितले. तर ज्येष्ठ शिक्षक संजय सातपुते यांनी रात्र शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिद्दीचा गौरव करत त्यांच्या संघर्षमय प्रवासाचे विशेष कौतुक केले.

## 'सार्वजनिक वाहतूक दिन' राबविण्याचे महापौरांचे नगरसेवकांना आवाहन

पुणे (दै. संध्या)

माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलेल्या 'सामूहिक राष्ट्रीय जबाबदारी'च्या आवाहनाला प्रतिसाद देत पुणे शहरात 'सार्वजनिक वाहतूक दिन' राबविण्याचे आवाहन महापौर मा. सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांनी सर्व नगरसेवक व नगरसेविकांना केले आहे. यासंदर्भात त्यांनी अधिकृत पत्राद्वारे सर्व लोकप्रतिनिधींना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या आर्थिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर इंधन बचत, परकीय चलनाची बचत आणि स्वावलंबी भारत उभारणीसाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे अत्यावश्यक असल्याचे महापौरांनी नमूद केले आहे. या उपक्रमाद्वारे शहरात पर्यावरणपूरक आणि शाश्वत वाहतुकीला चालना मिळणार आहे. महापौरांनी नगरसेवकांना केलेल्या आवाहनात पुढील बाबींवर भर देण्यात आला आहे: आठवड्यातून किमान एक दिवस खाजगी वाहनांचा वापर टाळून 'पीएमपीएमएल' बस किंवा 'पुणे मेट्रो'चा वापर करणे. शक्य त्या ठिकाणी 'कारपूलिंग'चा अवलंब करून इंधन बचतीस हातभार लावणे. स्वतः सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश देणे आणि या उपक्रमाला लोकचळवळीचे स्वरूप देणे. महापौरांनी यावेळी नमूद केले की, लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतल्यास नागरिकांमध्ये जनजागृती होऊन सार्वजनिक वाहतुकीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढेल.

## एनआयआयटी युनिव्हर्सिटीकडून २०२६ साठी प्रवेश प्रक्रिया जाहीर

पुणे (दै. संध्या)

ज्ञान-आधारित समाजातील उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये उच्च शिक्षण आणि अध्ययनात नाविन्यता आणण्याच्या दृष्टीकोनातून स्थापन झालेल्या आणि आपल्या उत्कृष्ट कामगिरीची 15 वर्षे पूर्ण करणाऱ्या युनिव्हर्सिटी ऑफ द फ्युचर म्हणजेच एनआयआयटी युनिव्हर्सिटी (एनयू) (NIIT University (NU)) ने वर्ष 2026 प्रवेश प्रक्रिया जाहीर केली आहे. विद्यार्थी आता सीयूईटी(CUET), इपमैट (IPMAT) आणि एमएचटी सीईटीच्या (MHT CET) गुणांच्या आधारे अर्ज करू शकतात. या गुणांमुळे विद्यार्थ्यांना एनयूएटी (एनआयआयटी युनिव्हर्सिटीची ॲप्टिट्यूड टेस्ट) मधून सवलत मिळेल आणि ते जवळपास 100 टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती मिळवू शकतात. एनयू सीयूईटी गुणांना

NU | NIIT UNIVERSITY — THE UNIVERSITY OF THE FUTURE — INDUSTRY-LINKED | TECHNOLOGY-BASED | RESEARCH-DRIVEN | SEAMLESS

मान्यता देणारी आघाडीची खाजगी युनिव्हर्सिटी आहे. अलिकडच्या वर्षांत 2,00,000 हून अधिक सीयूईटी उमेदवारांनी एनयूला आपली पसंती दर्शवली आहे.

विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या विद्याशाखेसाठी अर्ज करताना सीयूईटी, इपमैट आणि एमएचटी सीईटीचे स्कोअरकार्ड अपलोड करू शकतात आणि त्यांच्या पात्रतेनुसार शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ शकतात. युनिव्हर्सिटी विद्यार्थ्यांना भविष्यातील कामाच्या स्वरूपाशी सुसंगत कौशल्यांसह सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेले आधुनिक तंत्रज्ञान अभ्यासक्रम उपलब्ध करून देते, जसे बीटेक आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स, बीटेक सायबर सिक्युरिटी, बीटेक रोबोटिक्स अँड ऑटोमेशन, बीटेक बायोटेक्नॉलॉजी, बीटेक कॉम्प्युटर सायन्स अँडइंजिनिअरिंग, आणि बीटेक इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग. विद्यार्थी 12वी नंतर 3-वर्षांचा बीबीए, बीबीए आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, बीबीए बिझनेस ॲनालिटिक्स आणि 5-वर्षांचा इंटिग्रेटेड मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (आयएमबीए) प्रोग्रामची निवड करू शकतात.

या प्रवेश प्रक्रियेबाबत मत व्यक्त करत एनआयआयटी युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष प्रा. प्रकाश गोपालन म्हणाले, "एनआयआयटीयुनिव्हर्सिटीमध्ये आम्ही देशभरातील महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया अधिक सुलभ आणि विद्यार्थी-अनुकूल करण्यासाठी कटिबद्ध आहोत. सीयूईटी, इपमैट आणि एमएचटी सीईटीचे गुण स्वीकारून विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सोपी करणे आणि या स्पर्धात्मक परीक्षांसाठी त्यांनी घेतलेल्या कष्टांचा सन्मान करणे, हा आमचा उद्देश आहे. या पद्धतीमुळे पात्र उमेदवारांना एनयूएटी परीक्षेमधून सवलत मिळू शकते आणि ते प्रत्यक्ष पर्सनल इंटरॲक्शन फेरीकडे वळू शकतात. आमचा अशा प्रेरित विद्यार्थ्यांना लवकर शोधण्याचा आणि त्यांना उत्तम शैक्षणिक दर्जा, उद्योगांचा अनुभव व अनुभवात्मक शिक्षण देणारे वातावरण उपलब्ध करून देण्याचा मनसुबा आहे, ज्यामुळे ते भविष्यासाठी सज्ज करिअर घडवू शकतील."

## 'आयव्हीएफ' मातेतील गुंतागुंत टळली; ८४० ग्रॅम वजनाच्या बाळाचा जन्म

पुणे (दै. संध्या)

SURYA Hospitals

शस्त्रक्रियेनंतर मातेची प्रकृती वेगाने सुधारली असून, त्यांना तीन दिवसांनंतर डिस्चार्ज देण्यात आला. नवजात बाळावर सध्या विशेष निगराणीखाली उपचार सुरू आहेत. ही घटना एक आठवण करून देते, की अति-धोकादायक गर्भधारणेत नेहमीच धोक्याचे संकेत मिळत नाहीत, त्यामुळे माता आणि बालकाचे प्राण वाचवण्यासाठी नियमित तपासणी आणि वेळेवर उपचार घेणे अनिवार्य आहे.

पुणे येथील सूर्या मदर अँड चाइल्डकेअर हॉस्पिटलमध्ये एका ४६ वर्षीय 'आयव्हीएफ' मातेची नियमित तपासणी सुरू असताना अत्यंत गंभीर परिस्थिती समोर आली. डॉक्टरांना गर्भधारणेतील एक जीवघेणी; पण लक्षणे नसलेली गुंतागुंत आढळली. त्यानंतर तातडीने सिझेरियन शस्त्रक्रिया करून ८४० ग्रॅम वजनाच्या अकाली बाळाला जन्म देण्यात आला.

मीरा शर्मा (नाव बदलले आहे) या चार फेब्रुवारी २०२६ रोजी नियमित तपासणीसाठी रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. यावेळी त्या साधारण ३२ आठवड्यांच्या गरोदर होत्या. त्यांना वेदना, रक्तस्राव किंवा कोणताही त्रास जाणवत नव्हता. मात्र, चाचण्यांमध्ये 'प्री-एक्लॅम्पसिया' (उच्च रक्तदाब), 'आययूजीआर' (गर्भाशयात बाळाची वाढ खुंटणे), 'ॲनिमिया' (रक्तक्षय) आणि बाळाला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात बदल (डॉप्लर चेंजेस) अशी गंभीर लक्षणे दिसून आली. यामुळे माता आणि बाळ दोघांच्याही जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता.

या प्रकरणातील गुंतागुंत वाढवण्यामागे अनेक कारणे होती. ही गर्भधारणा 'आयव्हीएफ'द्वारे झाली होती. रुग्णाचे वय ४६ वर्षे होते आणि पूर्वीचे एक सिझेरियन झाले होते. त्यामुळे ही एक अति-धोकादायक केस होती. सूर्या मदर अँड चाइल्डकेअर हॉस्पिटलच्या सल्लागार प्रसूतिरोगतज्ज्ञ डॉ. वर्षाली माळी म्हणाल्या, की 'ही एक सुप्त; पण अत्यंत गंभीर केस होती. बाहेरून कोणतीही लक्षणे दिसत नव्हती; परंतु रक्ताभिसरण विस्कळित झाल्यामुळे बाळ आतून तीव्र दबावाखाली होते. अशा परिस्थितीत योग्य वेळी हस्तक्षेप करणे अत्यंत महत्त्वाचे असते.'

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वैद्यकीय पथकाने ३२ आठवडे आणि दोन दिवसांच्या गरोदरपणात तातडीने सिझेरियन शस्त्रक्रिया केली. केवळ ८४० ग्रॅम वजनाचे बाळ ब्रीच (उलटे) स्थितीत जन्माला आले आणि त्याला त्वरित 'एनआयसीयू'मध्ये दाखल करण्यात आले. सुदैवाने, जन्मानंतर बाळ लगेच रडले. डॉक्टरांच्या मते, प्रसूतीला विलंब झाला असता, तर 'यूटरोपॅलेसेंटल इनसफिशिएन्सी'मुळे बाळाचा जीव जाण्याचा धोका होता.

ही शस्त्रक्रिया डॉ. वर्षाली माळी (मुख्य शल्यचिकित्सक), डॉ. मोहिनी ठेंगणे (सहाययक डॉक्टर) आणि डॉ. ज्योत्स्ना थावल (अॅनेस्थेशिया तज्ज्ञ) यांच्या पथकाने 'स्पाइनल अॅनेस्थेशिया' देऊन यशस्वी पार पाडली. 'अशा घटनांमध्ये वेगवान क्लिनिकल मूल्यांकन आणि प्रसूती, अॅनेस्थेशिया आणि निओनेटल टीममधील समन्वय अत्यंत आवश्यक असतो. उच्च जोखमीच्या गर्भधारणेमध्ये केवळ लक्षणांवर अवलंबून न राहण्याचे महत्त्व या प्रकरणातून अधोरेखित होते,' असे डॉ. माळी यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांनी 'पुणे अॅग्री हॅकॅथॉन-२०२६' स्पर्धेचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

पुणे (दै. संध्या)

पुणे अॅग्री हॅकॅथॉन-२०२६' या स्पर्धेचे कृषी महाविद्यालय येथे १५ ते १७ मे २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात येणार असून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते पुणे अॅग्री हॅकॅथॉन-२०२६' या स्पर्धेचे १५ मे रोजी सकाळी ११.३० वाजता कृषी महाविद्यालय येथे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत मृदा आरोग्य आणि व्यवस्थापन, स्मार्ट जल व्यवस्थापन आणि ऑटोमेशन, शेती यांत्रिकीकरण (एआय आणि रोबोटिक्स), कृषी प्रक्रिया आणि मूल्य साखळी, अक्षय ऊर्जा आणि कृषी-कचरा व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि कीड व्यवस्थापन, हवामान-अनुकूल आणि डिजिटल शेती, प्रभावी कृषी प्रशासनासाठी एआय, तंत्रज्ञान आधारित हस्तक्षेप प्रभावी आपत्ती व्यवस्थापन, पीक नुकसानीचे मूल्यांकन आणि भाकितासाठी एआय, तंत्रज्ञान, साधने या विषयाशी निगडित नवकल्पना, उत्पादने असणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पना, उत्पादने यांना आकृष्ट करणे, सदर नव तंत्रज्ञांना योग्य व्यासपीठ व योग्य व्यवस्था निर्माण करणे या उद्देशाने या अॅग्री हॅकॅथॉनचे आयोजन करण्यात येत आहे, विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लाण्यासोबतच वैज्ञानिक संशोधनाला प्रोत्साहान मिळण्याकरिता ही स्पर्धा उपयुक्त ठरणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दिली आहे.

# भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करणार

मंत्री अतुल सावे

पुणे (दै. संध्या)

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे, याच पार्श्वभूमीवर भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.

श्री. सावे यांनी आज भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या कामाची पाहणी केली, यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, अधीक्षक अभियंता बिपिन शिंदे, महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे,



पीएमपीएल संचालक तथा नगरसेवक अजय खेडेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

श्री. सावे म्हणाले, क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती नागरिकांना व्हावी, याकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत चर्चा करुन भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करुन कामाची सुरुवात करण्यात आली होती. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून स्मारकाचे काम वेगाने सुरू असून सध्या ९० टक्के काम पूर्ण झाले आहे, या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत उर्वरित विकास कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी श्री. सावे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी श्री. नायर यांनी पुणे महानगरपालिकेच्यावतीने भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक विकास आराखड्याच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामांबाबत माहिती दिली.

इमारतीची वैशिष्ट्ये आणि सुविधा: स्मारकामध्ये सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित विविध आधुनिक सुविधा असणार असून यामध्ये ऑडिओ-व्हिडिओ शो, दोन्ही महापुरुषांच्या जीवनचरित्रावर आधारित 'थीम बेस्ड' ऑडिओ-व्हिडिओ शो आणि होलोग्राफीचे काम करण्यात येणार आहे. या दोन्ही महापुरुषांचे अर्धपुतळे आणि त्यांच्या कार्याची माहिती प्रदर्शित केली जाणार आहे. मुली आणि महिलांसाठी कौशल्य विकास केंद्र, मार्गदर्शन केंद्र आणि संगणक केंद्र उभारले जाणार आहे. स्मारकात एक अॅम्फीथिएटर देखील असणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पंतप्रधान यांनी केलेले आवाहन राष्ट्रीय जबाबदारीचे प्रतीक : यशवंतभाऊ भोसले



पिंपरी (दैनिक संध्या) : जगामध्ये सध्या सुरु असलेल्या आखाती युद्धामुळे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत असून, त्याची झळ भारतासारख्या विकसनशील देशांनाही बसत आहे. कच्च्या तेलाचे वाढते दर, मजबूत होत चाललेला अमेरिकन डॉलर, रुपयाची घसरण आणि आयात खर्चातील वाढ यामुळे भारतातील महागाई वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेब यांनी देशहिताच्या दृष्टीने नागरिकांना सोने-चांदी खरेदी, पेट्रोल-डिझेल वापर तसेच खाद्यतेल वापरामध्ये संयम राखण्याचे केलेले आवाहन हे केवळ आर्थिक नव्हे तर राष्ट्रीय जबाबदारीचे प्रतीक असल्याचे मत राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी व्यक्त केले. पिंपरी येथे पत्रकार परिषदेत (दि.१३)ते बोलत होते. यावेळी बोलताना कामगार नेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की,भारत हा कच्च्या तेलासाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे, खाद्यतेलासाठी परदेशी बाजारावर अवलंबून आहे, तसेच सोन्याची आयात मोठ्या प्रमाणात करतो. युद्धजन्य परिस्थितीत डॉलर मजबूत झाल्यास रुपयाची किंमत कमी होते, आयात महाग होते, पेट्रोल-डिझेल दर वाढतात, वाहतूक खर्च वाढतो, शेती उत्पादन खर्च वाढतो, आणि शेवटी सामान्य नागरिकांवरील महागाईचा भार वाढतो. याचा सर्वाधिक परिणाम मजूर वर्गावर, शेतकरी बांधवांवर, मध्यमवर्गीय कुटुंबांवर, लघुउद्योग आणि छोट्या व्यावसायिकांवर होतो. डिझेल महाग झाल्यास ट्रॅक्टर पंप, शेती मशागत खर्च वाढतो. मालवाहतूक महाग होते. भाजीपाला व जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढतात. पेट्रोल-डिझेल वापरामध्ये संयम, अनावश्यक खरेदी टाळणे, स्थानिक उत्पादनांचा वापर वाढवणे आणि देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी सहकार्य करणे ही आज काळाची गरज आहे. राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे मत स्पष्ट आहे की, देश आर्थिकदृष्ट्या मजबूत राहिला तरच मजूर, शेतकरी आणि सामान्य नागरिक सुरक्षित राहतील. त्यामुळे ही केवळ सरकारची लढाई नसून प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारने इंधनावरील कर कमी करणे, आवश्यक वस्तूंवरील नियंत्रण मजबूत करणे, कामगार व शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणे, रोजगारनिर्मिती वाढवणे, या बाबींवरही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. आज भारत एका आर्थिक आव्हानात्मक टप्प्यावर उभा आहे. या काळात संयम, राष्ट्रीय एकात्मता आणि आर्थिक शिस्त या माध्यमातून आपण देशाला अधिक सक्षम बनवू शकतो असे मत कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी व्यक्त केले.

### कोणताही क्लास न करता 'स्वबळावर' यूपीएससीत देशात 125 वा



पुणे (दैनिक संध्या) : कोणताही महागडा क्लास न लावता, केवळ जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यूपीएससी सारख्या देशातील सर्वोच्च परीक्षेत दुसऱ्या प्रयत्नात १२५ वा क्रमांक पटकावणे, हे कबीर राहुल कांबळे याचे यश थक्क करणारे आहे. कबीरने मिळवलेले हे यश सामान्य बुद्धिमत्तेचे काम नसून, त्याच्या असामान्य कष्टाची ही पावती आहे. खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला सुशिक्षित समाज कबीरच्या रूपाने आकाराला येत आहे, अशा शब्दांत आमदार अमित गोरखे यांनी कबीरच्या यशाचे कौतुक केले. अजमेरा-मासूळकर कॉलनीतील कबीर कांबळे याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या दैदिप्यमान यशाबद्दल आमदार अमित गोरखे यांनी त्याच्या घरी जाऊन त्याचे आणि त्याच्या कुटुंबीयांचे अभिनंदन केले. आजच्या काळात स्पर्धा परीक्षेसाठी लाखांच्या पटीत फी भरून क्लासेस लावले जातात. मात्र, कबीरने कोणत्याही क्लासचा आधार न घेता, घरात बसून दिवसाचे अनेक तास अभ्यासाला दिले. कबीर केवळ अभ्यासातच नाही तर तो 'मल्टिटॅलेंटेड' देखील आहे; त्याला गिटार वाजवण्याचीही आवड आहे. अभ्यासाच्या तणावातही त्याने आपली ही कला जोपासली आहे. याप्रसंगी आमदार अमित गोरखे भावूक होऊन म्हणाले की, कबीरच्या यशात त्याच्या आई-वडिलांच्या कष्टाचा वाटा मोलाचा आहे. आपल्या मुलाने देशाच्या सेवेसाठी उच्च पदावर जावे, हे स्वप्न पाहणाऱ्या या पालकांचेही कौतुक करावे तितके थोडेच आहे. कबीरसारखे अनेक तरुण आज यूपीएससी आणि एमपीएससीच्या माध्यमातून समाजसेवेसाठी पुढे येणे ही काळाची गरज आहे. सुशिक्षित आणि कर्तृत्ववान समाज निर्माण होणे, हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी आदरांजली ठरेल. आमदार गोरखे यांनी कबीरला पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा देताना विश्वास व्यक्त केला की, कबीर हा केवळ अधिकारी होणार नाही, तर तो समाजातील शेवटच्या घटकाचा आवाज बनून काम करेल. या यशाबद्दल संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरातून कबीरवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. एका सामान्य तरुणाचा हा असामान्य प्रवास आज संपूर्ण शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.

### भाजपा जगवणारे आणि वाढवणारे ज्येष्ठ नेतृत्व माणिकराव अहिरराव यांचा अमृतमहोत्सव



पिंपरी-चिंचवड (दैनिक संध्या) : भारतीय जनता पार्टीच्या ध्येय-धोरणांशी पाच दशकांहून अधिक काळ एकनिष्ठ राहून, पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्यात संघटनात्मक बांधणीत मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ नेतृत्व श्री. माणिकराव अहिरराव हे खऱ्या अर्थाने मार्गदर्शक आहेत. ज्या काळात भारतीय जनता पार्टीचे नाव घेण्यासही लोक धजावत नसत, अशा प्रतिकूल परिस्थितीत शहरात पक्ष जिवंत ठेवून तो वाढवण्यासाठी आपले आयुष्य समर्पित करणारे श्री. माणिकराव अहिरराव हे आमच्यासाठी प्रेरणेचा जिवंत स्रोत आहेत, अशा शब्दांत आमदार अमित गोरखे यांनी ज्येष्ठ नेते श्री. माणिकराव अहिरराव यांच्या कार्याचा गौरव केला. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती माणिकराव अहिरराव यांनी ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल (अमृतमहोत्सव), आमदार अमित गोरखे यांनी त्यांची भेट घेऊन अभीष्टचिंतन केले. १९८० च्या दशकापासून जनसंघ आणि त्यानंतर भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत पाईक म्हणून माणिकराव अहिरराव कार्यरत आहेत. पक्षाच्या सुरुवातीच्या काळात, जेव्हा राजकीय वातावरण आव्हानात्मक होते, तेव्हा त्यांनी शहराच्या कानाकोपऱ्यात जाऊन संघटनात्मक बांधणी केली. शहर सरचिटणीस या महत्त्वाच्या पदावर काम करताना त्यांनी शिस्तबद्ध कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली. पिंपरी-चिंचवडमध्ये आज भाजपाचा जो वटवृक्ष डौलाने उभा आहे, त्यामागे ज्येष्ठ नेतृत्व श्री. माणिकराव अहिरराव यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांचे कष्ट आहेत, असे प्रतिपादन आमदार गोरखे यांनी यावेळी केले. राजकारणासोबतच ज्येष्ठ नेतृत्व श्री. माणिकराव अहिरराव यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती म्हणून काम करताना त्यांनी गुणवत्तेवर आधारित शिक्षण पद्धतीवर भर दिला. सत्तेपेक्षा तत्त्वांना महत्त्व देणारे त्यांचे व्यक्तिमत्व आजही सर्वांना आदर्शवत आहे. याप्रसंगी बोलताना आमदार अमित गोरखे म्हणाले की, ज्येष्ठ नेतृत्व श्री. माणिकराव अहिरराव यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांचा अनुभव हा आम्हा तरुण लोकप्रतिनिधींसाठी दीपस्तंभासारखा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या विकासाचा आणि जनसेवेचा वारसा आम्ही यशस्वीपणे पुढे नेत आहोत. आज ते अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहेत, ही आम्हा सर्वांसाठी आनंदाची बाब आहे. त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. या अमृतमहोत्सवानिमित्त शहरातील विविध राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी माणिकराव अहिरराव यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

# ‘अंतर्नाद’ या संगीत नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग शनिवारी चिंचवडमध्ये

**भक्ती, संगीत आणि आत्मशोधाचा प्रवास घडवणारे भव्य नाटक - भाऊसाहेब भोईर**

**पिंपरी, पुणे (दै. संध्या) :**



पंढरीची वारी हा जगातील एकमेव सोहळा आहे की, या सोहळ्यात सर्व अठरा पगड जाती एकत्र येऊन वारी मध्ये सहभागी होतात. देहू, आळंदी पासून पंढरपूर पर्यंत वारीत सहभागी होण्याचे आत्मिक समाधान हे अडीच तासात देण्याचा प्रयत्न "अंतर्नाद" या संगीत नाटकातून प्रेक्षकांना मिळेल. लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्या पसंतीला उतरेल असा ५१ कलाकारांचा सहभाग असलेल्या या प्रयोगात अभंग, गवळण, भारुड, पोवाड्याचा समावेश या सात्विक कार्यक्रमात आहे. अंतर्मनातील नाद समजून घेण्यासाठी आणि स्वतः मधला विठ्ठल शोधण्यासाठी सर्वांनी

'अंतर्नाद' या संगीत नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग शनिवारी, (दि.१६) सायंकाळी ७ वाजता, चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात येऊन पहावा असे आवाहन अखिल भारतीय नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष व मोरया थिएटरचे संस्थापक, "अंतर्नाद" चे निर्माते भाऊसाहेब भोईर यांनी केले.

पिंपरी आचार्य अत्रे सभागृह येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत भोईर बोलत होते. यावेळी प्रणव सपकाळे, मनोज डाळिंबकर, निरंजन पेडगावकर, अंकिता शिवतरे, राजू बंग आदी उपस्थित होते.

यावेळी भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, वारीचं महत्व नवीन पिढीला "अंतर्नाद" मधून कळेल आणि त्यांना प्रेरणा मिळेल. संतांविषयी अनेक साहित्य, अभंग आहेत. परंतु या नाटकात त्याची आम्ही कॉपी केली नाही तर सर्व नवीन आहे. लोकसंगीतात वापरली जाणारी बहुतांशी सर्व वाद्य या संगीत नाटकात वापरली आहेत. आपल्या अंतरात्म्याचा आवाज समजून घेण्यासाठी आपण अंतर्नाद पहावे. संगीत, भक्ती आणि कलेचा वारसा जपणाऱ्या पिंपरी चिंचवडच्या सांस्कृतिक विश्वात 'मोरया थिएटर्स' एक नवी कोरी कलाकृती घेऊन येत आहे. पंढरीच्या वारीचा आणि आत्म्याचा प्रवास मांडणाऱ्या या भव्य संगीत नाटकाचा दुसरा प्रयोग हडपसर येथील विठ्ठलराव तुपे नाट्यगृहात शुक्रवारी (दि. २२ मे), सायंकाळी सात वाजता होणार आहे. रसिक प्रेक्षकांसाठी या नाटकाची तिकिटे 'बुक माय शो' आणि 'तिकीट खिडकी' या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत.

तसेच चिंचवड येथील नाट्यगृहाच्या तिकीट खिडकीवरही विक्री सुरू आहे अशी माहिती दिग्दर्शक मनोज डाळिंबकर यांनी दिली.

नाटकाचे कथानकः "अंतर्नाद" हे केवळ नाटक नसून तो आत्म्याशी संवाद साधणारा एक भावस्पर्शी प्रवास आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरच्या पवित्र भूमीकडे निघालेल्या माऊलींच्या पालखी सोहळ्याचे आणि त्यातील वारकऱ्यांच्या श्रद्धेचे जिवंत चित्रण यात पाहायला मिळेल. दिंडीत सहभागी झालेल्या एका युवा वारकऱ्याची विठ्ठल भक्ती आणि त्यातून घडलेला त्याचा अंतर्मनातील प्रवास म्हणजे 'अंतर्नाद' होय. या नाटकाचा निर्माता म्हणून काम करताना, वारकरी परंपरेला अभिवादन करणारी ही आधुनिक कलाकृती रसिकांच्या मनाला नक्कीच स्पर्श करेल, असा मला विश्वास भाऊसाहेब भोईर यांनी व्यक्त केला.

नाटकाचे लेखन विनोद रत्ना यांनी केले असून, संकल्पना व दिग्दर्शन मनोज डाळींबकर यांचे आहे. संगीत निरंजन पेडगावकर यांनी दिले आहे आणि मुराद तांबोळी यांनी गीते शब्दबद्ध केली आहेत. नृत्यदिग्दर्शन अंकिता शिवतरे व सौगंध कापसे यांनी केले आहे.

तांत्रिक बाजू अभिप्राय कामठे (प्रकाश योजना), कमलेश बिचे (रंगभूषा) आणि वेदिका काळे (वेशभूषा) यांनी सांभाळली आहे. सहाय्यक दिग्दर्शन आकाश थिटे यांनी केले आहे.

## आर्ट मॅजिक चित्र प्रदर्शन रविवार पासून (दि.१७)

**पुणे (दै. संध्या) :**

आर्ट मॅजिक ड्रॉईंग क्लासेसतर्फे 'आर्ट मॅजिक २०२६” या १९ व्या चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन रविवार दि. १७ मे ते मंगळवार दि. १९ मे २०२६ दरम्यान बालगंधर्व कलादालन, जंगली महाराज रोड, पुणे येथे भरविण्यात येणार आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन रविवार दि. १७ मे रोजी सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे. या प्रदर्शनाच्या आयोजिका आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकार महालक्ष्मी भालचंद्र पवार असून सहआयोजक अंबादास भालचंद्र पवार आहेत. मागील अनेक वर्षांपासून महालक्ष्मी पवार यांनी विद्यार्थ्यांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण करून त्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी करून घेतले आहे. महालक्ष्मी पवार यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना राजस्थान सरकारने कलागौरव पुरस्कारानेही सन्मानित केले आहे. प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी नगरसेविका प्रा. डॉ. निवेदिता गजानन एकबोटे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे. तसेच प्रसिद्ध चित्रकार मलिकार्जुन सी. सिंदगी व सुनील सोनावणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. प्रदर्शनात सुमारे ६० विद्यार्थ्यांच्या १८० हून अधिक कलाकृतींचा समावेश करण्यात आला आहे. वयाच्या ३ वर्षांपासून ते ४० वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी तसेच हौशी चित्रकारांनी यात सहभाग घेतला आहे.

## चाकणला व्यवसायिकांनी थाटली रसवंतीची गुऱ्हाळे

**चाकण (दै. संध्या) :**

सूर्य आग ओकू लागल्याने प्रचंड उन्हापासून नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी चाकण शहरात व्यवसायिकांनी मोठ्या दिमाखात रसवंतीची गु-हाळे थाटली आहेत.

उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढत चालली असून, गेल्या पंधरा दिवसांपासून चाकण शहरात अचानक तापमानात वाढ झाली आहे. चाकणसह उद्योग नगरीत सर्वत्र शीतपेये, रसवंतीची दुकाने मोक्याच्या व वर्दळीच्या ठिकाणी सुरू झाली आहेत. बर्फासह रसाचा एक फुल ग्लास २० रुपयाला विकला जात असल्याचे येथील श्री स्वामी समर्थ रसवंती गृहाच्या मालकिन सीमा खेडकर यांनी सांगितले. रसवंती गृहामध्ये ग्राहकांची उन्हामुळे मोठी गर्दी होऊ लागली आहे. थंड पाणी, कोल्ड्रिंक्स, उसाचा रस, मठ्ठा, ताक,



लस्सी, सरबत, बर्फाचा गोळा अशा वेगवेगळ्या प्रकारच्या फळांनी आणि रंगाने चाकणला दुकाने सजली आहेत. उन्हाचे चटके वाढू लागल्याने नागरिक बेजार झाले आहेत. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होत असते. त्यामुळे शरीराला ऊर्जा आणि तहान भागवण्यासाठी आता थंडगार सरबत, उसाचा रस, आईस्क्रीम, कुल्फी, लिंबू सरबत यासारखी थंड पेय पदार्थांची दुकाने गजबजून गेली आहेत. सीमा खेडकर यांनी सांगितले की, " उसाचा रस आणि त्याबरोबरच थंड पेयांना प्रचंड मागणी वाढली आहे. यामुळे अनेक थंड पेयांच्या किमतीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. लग्नसराई सुरू असल्यामुळे नागरिक पाणी पिण्यापेक्षा उसाचा रस व लिंबू सरबत पिण्यावर भर देत आहेत."

चाकण शहरात तळेगाव चौक, माणिक चौक, नगर परिषद परिसर, महात्मा फुले चौक, आंबेठाण चौक, मार्केट यार्ड परिसर, महात्मा फुले नगर आदी मोक्याच्या ठिकाणी गुऱ्हाळ चालकांनी रसवंती गृहे थाटल्याने नागरिकांची वर्दळ वाढली असल्याचे सीमा खेडकर, विजय खेडकर, भगवान घोडेकर व महेश शिरोळे यांनी सांगितले.

## इएसआय यंत्रणा सक्षम करण्यास सरकार कटिबद्ध

**मुंबई (दै. संध्या) :**



महाराष्ट्रातील सुमारे 49 लाख सभासद व 1 कोटी 92 लाख लाभधारक असलेल्या कामगार राज्य विमा योजना राज्य कामगार विमा योजना (ESIS) अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात इएसआय (ESI )रुग्णालये आणि प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात दवाखाने सुरू करण्यात येतील, अशी महत्त्वपूर्ण हमी महाराष्ट्राचे कामगार मंत्री नामदार मा आकाश फुंडकर व आरोग्यमंत्री नामदारमा प्रकाश आबीटकर यांनी दिली.

भारतीय मजदूर संघाच्या वतीने 16 एप्रिल 2026 रोजी आयोजित मोर्चाच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या निवेदनावर चर्चा करण्यासाठी दिनांक 12 मे 2026 रोजी मंत्रालयात कामगार मंत्र्यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस कामगार राज्य विमा योजना आयुक्त रमेश चव्हाण, संचालक श्रीमती अनुलेखा झा, रिजनल डायरेक्टर, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार उपायुक्त लक्ष्मण भुजबळ तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भारतीय मजदूर संघाच्या वतीने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. अनिल ढुमणे, प्रदेश उपाध्यक्ष सचिन मेंगाळे, कोशाध्यक्ष ॲड. बाळकृष्ण कांबळे, पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, सुरेश पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष अशोक निकम, नागपूर सेक्रेटरी हर्षल ठोंबरे, सोनावणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत भारतीय मजदूर संघाने राज्यातील इएसआय (ESI) योजनेतील गंभीर त्रुटी व कामगारांना भेडसावणाऱ्या अडचणी सरकारच्या निदर्शनास आणून दिल्या. राज्यात ESI योजनेअंतर्गत मंजूर 2400 बेड क्षमतेपैकी केवळ 1204 बेड उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. ठाणे, पालघर, रायगड यांसारख्या 20 लाखांहून अधिक सभासद असलेल्या भागात एकही इएसआय (ESI) रुग्णालय नसल्याची गंभीर बाबही मांडण्यात आली. अल्प दवाखाने, अपुरी वैद्यकीय सुविधा आणि निकृष्ट दर्जाच्या व्यवस्थेमुळे कामगारांकडून नियमित योगदान जमा होत असूनही त्यांना योजनेचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याकडे संघटनेने सरकारचे लक्ष वेधले. महाराष्ट्रातून योजनेसाठी सर्वाधिक निधी जमा होत असतानाही राज्यातील कामगारांवर अत्यल्प खर्च होत असल्याची बाबही बैठकीत मांडण्यात आली.

भारतीय मजदूर संघाने मांडलेल्या मुद्द्यांशी सरकारने सहमती दर्शवून राज्यातील मंजूर 18 नवीन इएसआय रुग्णालयांचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. तसेच प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात इएसआय (ESI) दवाखाने सुरू करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले. प्रत्येक कामगाराला इएसआय (ESI ) योजनेची माहिती मिळावी, प्रत्येक जिल्ह्यातील उपलब्ध दवाखाने व रुग्णालयांची माहिती सुलभ व्हावी यासाठी जनजागृती मोहीम राबविण्याचे निर्देशही देण्यात आले. औद्योगिक वसाहतींमध्ये माहिती शिबिरे आयोजित करून त्यामध्ये भारतीय मजदूर संघाला सहभागी करून घेण्यात येईल, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

## “सरकारच्या महिला सुरक्षा अजेंड्याची पनवेलमध्ये प्रभावी अंमलबजावणी”- सौ. ममता प्रितम म्हात्रे

**उरण (दै. संध्या) :**

राज्यामध्ये महिला सुरक्षा, महिला सन्मान आणि बाल संरक्षणाला प्राधान्य देणाऱ्या महायुती सरकारच्या धोरणानुसार पनवेलमध्येही महिला व बाल सुरक्षेचा अजेंडा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी पुढाकार घेतला आहे. त्याच अनुषंगाने आज कामोठे पोलीस ठाण्यास भेट देत वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना महिला व बाल सुरक्षेबाबत विविध सकारात्मक आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

राज्यामध्ये महिलांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, जनजागृती मोहीम, महिला हेल्पलाईन, पॉक्सो कायद्यांतर्गत कठोर कारवाई आणि शालेय स्तरावरील सुरक्षा शिक्षण याला अधिक बळ देण्यासाठी स्थानिक पातळीवर समन्वयातून काम करण्याची आवश्यकता असल्याचे सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी यावेळी नमूद केले. विशेष म्हणजे “Good Touch – Bad Touch” या शालेय जनजागृती उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होत असून अशा उपक्रमांचे सकारात्मक परिणाम समाजामध्ये दिसून येत आहेत. मुलांना लहान वयातच सुरक्षिततेबाबत योग्य मार्गदर्शन मिळणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनामध्ये निवासी संकुल, सोसायट्या, मॉल, व्यावसायिक संकुले व सार्वजनिक ठिकाणी कार्यरत सुरक्षा रक्षकांची नियमित पोलीस पडताळणी करण्याबाबत सूचना करण्यात आल्या. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची योग्य तपासणी झाल्यास नागरिकांमध्ये अधिक विश्वासाचे वातावरण निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले.

# डिप्लोमा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी एक स्मार्ट आणि परिणामकारक पर्याय

**- संकलन : विभागीय माहिती कार्यालय, पुणे**

आजच्या स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या युगात वेळेचे महत्त्व अधिक वाढले आहे. करिअर घडवताना योग्य वेळी योग्य निर्णय घेतला, तर पुढील प्रवास अधिक सुलभ आणि यशस्वी होऊ शकतो. अनेक विद्यार्थी आणि पालकांसाठी दहावीनंतरचा टप्पा हा करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. पारंपरिक शिक्षण पद्धतीनुसार अकरावी-बारावी आणि त्यानंतर सीईटी सारख्या स्पर्धा परीक्षा हा एक परिचित मार्ग आहे. मात्र या प्रक्रियेमध्ये वेळ, मेहनत आणि अनिश्चितता यांचा मोठा भाग असतो. अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा अभियांत्रिकी पदविका (इंजिनिअरिंग डिप्लोमा) अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी एक स्मार्ट आणि परिणामकारक पर्याय म्हणून पुढे येतो आहे.

आज कौशल्याधारित व्यवसायिक शिक्षण रोजगार आणि स्वंयरोजगाराच्या दृष्टीकोनातून गरजेचे बनले आहे. अशा वेळी इंजिनिअरिंग डिप्लोमा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सैद्धांतिक आणि प्रत्यक्ष अनुभवाधारित ज्ञान देण्याबाबतीत समतोल साधत असल्यामुळे त्यांना जास्तीत जास्त संधी उपलब्ध होऊ शकतात.

डिप्लोमा अभ्यासक्रम निवडल्यास विद्यार्थी थेट तांत्रिक शिक्षणाच्या प्रवाहात प्रवेश करु शकतात. ताण मुक्त वातावरणात शिकणारा विद्यार्थी अधिक चांगल्या प्रकारे प्रगती करतो. डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीच्या पदवी अभ्यासक्रमात म्हणजेच बी.ई किंवा बी. टेक मध्ये थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळतो. या प्रक्रियेला 'लेटरल एंट्री' असे म्हटले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास अधिक वेगवान बनतो. ते थेट पुढील स्तरावर जाऊन शिक्षण सुरू करू शकतात.

डिप्लोमा शिक्षणाचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानासोबत प्रात्यक्षिक अनुभवही मिळतो. प्रयोगशाळा, कार्यशाळा आणि प्रकल्पांच्या (प्रोजेक्ट्स) माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम करण्याची सवय लागते. त्यामुळे इंजिनिअरिंगच्या पुढील टप्प्यात प्रवेश घेतल्यानंतर त्यांना विषय समजणे अधिक सोपे जाते. त्यांच्या संकल्पना स्पष्ट असतात आणि त्यांना अभ्यासात आत्मविश्वास वाटतो. अनेकदा डिप्लोमा केलेले विद्यार्थी पारंपरिक मार्गाने आलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक सक्षम दिसतात, कारण त्यांच्याकडे आधीच प्रॅक्टिकल अनुभव असतो. अनुभव हे ज्ञानाचे सर्वात मोठे शिक्षक आहे.

वेळेची बचत आणि तांत्रिक कौशल्यांची मजबूत पायाभरणी हे दोन्ही घटक करिअर घडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजच्या उद्योग क्षेत्राला केवळ सैद्धांतिक ज्ञानातच नव्हे, तर प्रत्यक्ष कामातही पारंगत असतील अशा विद्यार्थ्यांची गरज आहे. डिप्लोमा अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी अशा प्रकारे तयार होतात. दहावीनंतरच विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या तांत्रिक शाखेत प्रवेश घेतात. त्यामुळे त्यांची दिशा आणि दृष्टीकोन स्पष्ट राहतो, ते त्याच क्षेत्रात कौशल्य विकसित करु शकतात. या प्रक्रियेमुळे त्यांच्या करिअरचा पाया अधिक मजबूत बनतो. आजच्या काळात जितक्या लवकर विद्यार्थी योग्य दिशा निवडतात, तितक्या लवकर ते यशाच्या दिशेने वाटचाल करु शकतात.

करिअरची सुरुवात जितकी स्पष्ट आणि ठोस असेल, तितका पुढील प्रवास अधिक सोपा आणि यशस्वी होतो. डिप्लोमा हा केवळ एक पर्याय नसून तो एक स्मार्ट निर्णय आहे, जो विद्यार्थ्यांना वेळेची बचत करून देतो आणि त्यांना करिअरच्या दिशेने वेगाने पुढे नेतो. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा इंजिनिअरिंग डिप्लोमा अभ्यासक्रम हजारो विद्यार्थ्यांसाठी यशाचा मार्ग ठरत आहे. तांत्रिक ज्ञान, प्रॅक्टिकल अनुभव आणि पुढील शिक्षणासाठी थेट संधी या सर्व गोष्टींचा संगम या अभ्यासक्रमामध्ये दिसून येतो.

योग्य निर्णय हा यशाची पहिली पायरी असतो. दहावीनंतर योग्य मार्ग निवडल्यास करिअरचा प्रवास अधिक वेगवान आणि परिणामकारक बनतो. डिप्लोमा नंतर थेट इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश ही संधी विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने करिअरला गती देणारी ठरते. अधिक माहितीसाठी भेट द्या: https://msbte.ac.in.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' येथे भव्य प्रकाशोत्सव

पिंपरी (दैनिक संध्या) : धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बोऱ्हाडेवाडी-मोशी येथील स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण येथे हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. १४ मे व शुक्रवार दि. १५ मे २०२६ या दोन दिवसांत होणाऱ्या या विशेष सोहळ्यात हिंदुस्थानच्या इतिहासातील एकमेवाद्वितीय लाईट शो, आकर्षक विद्युत रोषणाई आणि शिवकालीन वैभवाचे दर्शन घडविणारे विविध उपक्रम सादर करण्यात येणार आहेत. सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत होणाऱ्या विशेष लाईट शोमध्ये धर्मवीर शंभूराजेंच्या पराक्रमाचा, त्यागाचा आणि स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाचा इतिहास आधुनिक प्रकाशयोजना, ध्वनी आणि दृश्य माध्यमांच्या सहाय्याने साकारण्यात येणार आहे. संपूर्ण परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार असून, 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' परिसर भगव्या प्रकाशाने उजळून निघणार आहे. शिवप्रेमींसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे "धर्मवीर शंभूराजेंना अनोखी मानवंदना" या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम इतिहासात पहिल्यांदाच आयोजित करण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदान आणि हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी केलेले संघर्ष यांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पिंपरी चिंचवडसह पुणे परिसरातील हजारो शिवप्रेमी या सोहळ्यास उपस्थित राहतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून धर्मवीर शंभूराजेंच्या तेजस्वी इतिहासाचा जागर करावा, असे आवाहन हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

### MNGL गॅस बिल अपडेटच्या नावाखाली एकाची फसवणूक; 1 लाख 58 हजार लंपास




पिंपरी (दैनिक संध्या) : "तुमचे MNGL गॅस कनेक्शन बंद होणार असून थकीत बिल तात्काळ भरा" असा बनावट संदेश पाठवून एका नागरिकाची तब्बल १ लाख ५८ हजार ८०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि.६ मे २०२६ रोजी रात्री ८ वाजल्यापासून ते ७ मे २०२६ दरम्यान नेवाळे वस्ती, चिखली परिसरात घडली. फिर्यादीच्या मोबाईलवर MNGL GAS कनेक्शन कट होणार असल्याचा मेसेज आला होता. तसेच थकीत गॅस बिल तात्काळ भरा असे सांगत आरोपीने "BIN MNGL BILL UPDATE" नावाची फाईल पाठवली होती. फिर्यादीने त्या मेसेजवर विश्वास ठेवून संबंधित फाईल ओपन केली. त्यानंतर अवघे १२ रुपये थकीत गॅस बिल भरण्यासाठी ॲपमध्ये स्वतःच्या क्रेडिट कार्डची माहिती भरली. मात्र त्यानंतर आरोपीने फिर्यादीचा मोबाईल हॅक करून त्यांच्या साउथ इंडियन बँकेच्या वनकार्ड क्रेडिट कार्डमधून वेगवेगळ्या व्यवहारांद्वारे पैसे ट्रान्सफर केले. या प्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक साळुंखे करत आहेत. नागरिकांनी कोणतीही संशयास्पद लिंक, APK फाईल किंवा बिल अपडेट संदेशांवर विश्वास ठेवू नये, तसेच बँक व कार्डची माहिती कोणत्याही ॲपमध्ये भरताना सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### नटसम्राट निळू फुले नाट्यगृह दुरवस्थेत

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : शहरातील कलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, रसिकांना दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेता यावा आणि विद्यार्थ्यांच्या कला-सादरीकरणांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने महापालिका प्रशासनाने पिंपळे गुरव येथे उभारलेले नटसम्राट निळू फुले नाट्यगृह आज दुरवस्थेच्या गर्तेत सापडले आहे. अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या नाट्यगृहाची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली असून, कलाकार, आयोजक आणि रसिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पिंपळे गुरव परिसरातील हे नाट्यगृह मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळा, महाविद्यालये तसेच विविध सांस्कृतिक संस्थांसाठी प्रमुख आकर्षण ठरले आहे. सांगवी, औंध, बाणेर, पाषाण, चतुश्रृंगी, वाकड, रहाटणी, पिंपळे सौदागर, पिंपळे निलख, कासारवाडी, दापोडी तसेच पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक शैक्षणिक संस्था येथे स्नेहसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध कला सादरीकरणासाठी प्राधान्याने नाट्यगृहाची निवड करतात. मोजके सोमवार वगळता वर्षभर नाट्यगृह बुक असते. नाटकांचे प्रयोग तुलनेने कमी असले तरी सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल मोठ्या प्रमाणात सुरू असते. यामुळे महापालिकेने तातडीने नाट्यगृहाची पाहणी करून दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# महाराजांचा इतिहास युवा पिढीपर्यंत पोहोचविणारा स्तुत्य उपक्रम



#### छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीदिनाचे (१४ मे) कार्यक्रम

गुरूवार दि.१४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाद्वारे त्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. सकाळी १०.३० वाजता महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस तर १०.४५ वाजता बर्ड व्हॅली येथील त्यांच्या पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.या कार्यक्रमास खासदार, आमदार, महापालिकेचे पदाधिकारी,अधिकारी,सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित राहणार आहेत. तर सायंकाळी ५ वाजता शिवशाहीर सुरेश सुर्यवंशी आसंगीकर यांचा छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित शाहीरीचा कार्यक्रम तर सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध व्याख्याते नितीन बानगुडे पाटील यांचे "छत्रपती संभाजी महाराज-एक अद्वितीय योध्दे" या विषयावर व्याख्यान होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना शहरवासियांनी उपस्थित रहावे असे आवाहन महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

**पिंपरी (दै. संध्या)**

छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य, पराक्रम आणि स्वराज्यासाठीचे योगदान सर्वश्रुत असले तरी युवा पिढी आणि शालेय विद्यार्थ्यांना त्यांचा इतिहास जिवंत स्वरूपात अनुभवता यावा, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महानाट्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे ही कौतुकास्पद बाब आहे. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी प्रत्येकाने आपल्या परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांना अशा कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित करावे जेणेकरून प्रत्येकापर्यंत हा इतिहास जीवंतपणे अनुभवण्याची संधी मिळेल, असे आवाहन आमदार अमित गोरखे यांनी केले.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय पराक्रमाची, राष्ट्रनिष्ठेची आणि स्वराज्य रक्षणासाठी दिलेल्या बलिदानाची जाज्वल्य गाथेचा इतिहास उलगडणाऱ्या 'शिवरूद्र शंभुराजे' या भव्य महानाट्याच्या दुसऱ्या प्रयोगास काल प्रारंभ झाला, यावेळी आमदार अमित गोरखे हे बोलत होते.

काल झालेल्या महानाट्याच्या कार्यक्रमास नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते सागर तापकीर, राजेंद्र घावटे,संजय कुरबेट्टी, हेमा पारिसकर,जितेंद्र छाबडा यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार अमित गोरखे म्हणाले, छत्रपती संभाजी महारा यांच्या जन्मोत्सवानिमित्त महानगरपालिका, प्रभागातील नगरसदस्य आणि विविध सामाजिक संघटनांच्या सहकार्याने अतिशय स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये सामाजिक संघटनांचा देखील सहभाग असून त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरामध्ये इतिहास घडविणारा आणि ऐतिहासिक ठरणारा हा सांस्कृतिक उपक्रम सर्व लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने सुरू झाला असून तो भविष्यातही अखंडपणे सुरू राहील, असा विश्वास देखील आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केला.

१० ते १४ मे २०२६ या कालावधीत चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यान येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रबोधन पर्वाअंतर्गत ११ ते १३ मे २०२६ यादरम्यान शिपस्पर्श शिवसह्याद्री प्रतिष्ठान निर्मित 'शिवरूद्र शंभुराजे' या महानाट्याचे सादरीकरण होत आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर असलेले हे महानाट्य ॲड. विनय चंद्रकांत दाभाडे लिखित व दिग्दर्शित असून प्रतिक चंद्रकांत दाभाडे यांनी सहदिग्दर्शन केले आहे.

तीन मजली भव्य रंगमंच, २०० हून अधिक कलाकारांचा सहभाग, थरारक लढाईचे प्रसंग तसेच महाराष्ट्रातील विविध लोककलांचा समावेश असलेल्या या महानाट्यातून छत्रपती संभाजी महाराजांचा संघर्षमय जीवनप्रवास प्रभावीपणे उभा करण्यात आला आहे. संभाजीनगर, चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यानाच्या मागील बाजूस शिवशंभो उद्यानासमोर असलेल्या मोकळ्या मैदानात सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत हे महानाट्य रंगत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा प्रेरणादायी इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, स्वराज्याच्या विचारांचे संवर्धन करणे आणि इतिहासाबाबत जनजागृती घडवून आणणे हा या महानाट्याच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.

## शहर अभियंता पदावर कार्यक्षम अभियंत्याची नियुक्ती करण्याची मागणी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे शहर अभियंता पद गेल्या अडीच महिन्यांपासून रिक्त असल्याने शहरातील विकासकामे आणि प्रशासकीय प्रक्रियेवर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करत माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश नानासाहेब वाघेरे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे तातडीने नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. रमेश वाघेरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आयुक्तांनी पदभार स्वीकारून दोन महिने पूर्ण झाले तरी अद्याप कायमस्वरूपी शहर अभियंत्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही. शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या आणि विकासकामांच्या पार्श्वभूमीवर हे पद रिक्त राहणे गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. महापालिकेत अनुभवी, शैक्षणिक पात्रता असलेले आणि कार्यक्षम स्थानिक अभियंते उपलब्ध असताना नियुक्ती लांबणीवर पडत असल्याबाबत शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. काही राजकीय हस्तक्षेपामुळे हे पद रिक्त ठेवल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता, आवश्यक प्रशासकीय अनुभव आणि शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अभियंत्याची शहर अभियंता पदावर तातडीने नियुक्ती करावी, अशी मागणी रमेश वाघेरे यांनी केली आहे.

## मनाच्या आरोग्यासाठी एक कला जोपासा - अतुल कुदळे

### एसबीपीआयएम येथे झिंग २०२६ वार्षिक पारितोषिक वितरण संपन्न

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी, पुणे (दि. १३ मे २०२६) महाविद्यालयीन काळातील वय म्हणजे खरे खोटे, बरे वाईट यातील फरक समजणारा काळ असतो. या काळात स्वतःवर विश्वास ठेऊन निर्णय घेतला पाहिजे. निश्चित केलेले ध्येय साध्य करण्यासाठी मनावर ताबा मिळवून निर्णय घ्यावे लागतात. या चंचल मनाचे आरोग्य सुदृढ रहावे यासाठी तुम्हाला आवडणारी कोणतीही किमान एक कला जोपासा आणि त्यासाठी वेळ द्या. जे काही करणार ते मन लावून करा, यश नक्की मिळेल असा सल्ला युवा अभिनेता अतुल कुदळे यांनी विद्यार्थ्यांना दिला.





पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे "झिंग २०२६" हा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले की, संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विविध आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये बक्षिसे जिंकली आहेत, तसेच शैक्षणिक गुणवत्तेतही उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. अनेक विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळाली असून संस्थेचा लौकिक वाढवला आहे. यावेळी शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच प्लेसमेंट क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. प्रणिता बुरबुरे, डॉ. दिलीप पवार, डॉ. भूषण परदेशी, प्रा. समीर ठाकूर यांनी संयोजन केले.

## पिंपरी चिंचवड क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर ठरतेय – महापौर रवि लांडगे

किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या खेळाडूंचा महापौर कार्यालयात गौरव; आंतरराष्ट्रीय स्तरावर पिंपरी-चिंचवडचा झेंडा उंचावल्याबद्दल कौतुक

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड हे केवळ औद्योगिक शहर नसून क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर बनत आहे. आपल्या शहरातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत आहेत, ही प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी बाब आहे. जयदेव म्हमाणे यांच्यासारख्या खेळाडूंमुळे शहरातील युवा पिढीला नवी ऊर्जा मिळत आहे. अशा खेळाडूंच्या पाठीशी महापालिका कायम ठामपणे उभी राहील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या विद्यार्थ्यांचा महापौर कार्यालयात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव उपस्थित होते. खेळाडूंना भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासनदेखील यावेळी महापौर रवि लांडगे यांनी दिले.

उत्तर प्रदेशमधील सहारनपूर येथे नुकत्याच भारत-नेपाळ यांच्यात पार पडलेल्या इंडियन इंटरग्रील चॅम्पियन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून खेळताना थेरगाव येथील चार खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराचा गौरव वाढविला. यामध्ये जयदेव म्हमाणे यांनी सुवर्णपदक पटकावत विशेष यश संपादन केले. यापूर्वीही त्यांनी तब्बल ११ सुवर्णपदके जिंकून आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप उमटवली आहे. त्यांच्या उल्लेखनीय यशाची दखल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील घेतली असून, हे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाचे क्षण असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, 'खेळाडूंचे यश हे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण शहराचा सन्मान असतो. कठोर मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर पिंपरी चिंचवडचे नाव पोहोचवले आहे. भविष्यात अशा खेळाडूंना अधिक प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,' असे देखील त्यांनी सांगितले.

## महापौर रवि लांडगेंना परदेश दौऱ्याची मान्यता

**पिंपरी (दै. संध्या)**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशहितासाठी काटकसर करा असं म्हणत परदेश वाऱ्या टाळण्याचं आवाहन केलं आणि त्यानंतर काही तासांतच महाराष्ट्र शासनाने पिंपरी चिंचवडच्या महापौरांना परदेश दौऱ्याची मान्यता दिली आहे. केंद्रात, राज्यात आणि पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपची सत्ता आहे, तरी सुद्धा महाराष्ट्र शासनाने पंतप्रधान मोदींचं आवाहनाला छेद दिला आहे. आता महापौर रवि लांडगे हे पंतप्रधानांच्या आवाहनानुसार देशहितासाठी हा परदेश दौरा रद्द करणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे संयुक्त राष्ट्रांच्या UN-Habitat संस्थेचे वर्ल्ड अर्बन फोरम हे तेरावे अधिवेशन आहे. यामध्ये शहरी विकास विषयक जागतिक परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. बाकु अझरबैजान येथे पार पडणाऱ्या या परिषदेला रवि लांडगे आणि त्यांचे स्वीय सहाय्यक अभय चौगुले उपस्थित राहणार आहेत. 17 मे ते 22 मे दरम्यान हे जागतिक अधिवेशन पार पडणार असून पिंपरी पालिकेच्या स्थायी समितीने या दौऱ्यासाठी निधी ही मंजूर केला आहे. या दौऱ्यावर 8 लाख 80 हजार 281 रुपयांची उधळपट्टी केली जाणार आहे. पंतप्रधान मोदींनी 10 मे ला देशहितासाठी जनतेला आवाहन केलं. काटकसर करण्यावर भर द्या, असं आवर्जून सांगितलं. पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे 11 मे ला भाजपचं सरकार असलेल्या महाराष्ट्र शासनाने महापौरांच्या परदेश दौऱ्याला मान्यता देत पंतप्रधानांच्या आवाहनाला छेद दिला आहे.

**■ पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनानंतर महापौर कोणता निर्णय घेणार?**

# ऊर्जा बचत धोरणाबाबत महापालिकेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

#### ऊर्जा बचतीच्या प्रकल्पांसाठी निधी संरचना आणि अंमलबजावणीवर झाली चर्चा

**पिंपरी (दै. संध्या)**

महापालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा बचतीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम हे केवळ अभ्यास, अहवाल आणि सादरीकरणांपुरते मर्यादित राहता कामा नयेत. प्रत्यक्ष अंमलबजावणीतून वीज वापरात लक्षणीय बचत आणि कार्यक्षम ऊर्जा व्यवस्थापनाचे ठोस परिणाम दिसून येणे गरजेचे आहे. त्यासाठी वेळबद्ध कृती आराखडा तयार करून ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धन, आर्थिक बचत आणि शाश्वत विकास या तिन्ही उद्दिष्टांचा समतोल साधणारी कार्यपद्धती महापालिकेने स्वीकारणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा अवलंब करून वीज बचत, खर्च नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धन साध्य करण्याच्या उद्देशाने ऊर्जा बचत धोरणांतर्गत विविध उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण बैठक पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात संपन्न झाली. या बैठकीत महापालिकेच्या विविध प्रशासकीय इमारतींमधील एसी यंत्रणा, वॉटर पंप तसेच अन्य विद्युत उपकरणांच्या ऊर्जा वापराचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता संतोष दुर्गे तसेच एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी), अलायन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट




इकॉनॉमी (ए.इ.इ.इ) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सी.इ.इ.डब्ल्यू) या संस्थांचे प्रतिनिधी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अलायन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ) सोबत यापूर्वीच सामंजस्य करार केला असून त्या अंतर्गत अलायन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ), एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सी.इ.इ.डब्ल्यू) यांच्या संयुक्त विद्यमाने ऊर्जा कार्यक्षमतेसंदर्भातील अभ्यास आणि नियोजन प्रक्रिया सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या ऊर्जा वापराचे विश्लेषण, ऊर्जा बचतीच्या संधींचा शोध, आर्थिक व्यवहार्यता तसेच आवश्यक निधी संरचना याबाबत विविध टप्प्यांमध्ये काम करण्यात येत आहे.

बैठकीमध्ये इन्सेप्शन रिपोर्ट, महापालिकेच्या वित्तीय स्थिती व ऊर्जा खर्च विश्लेषण अहवाल, प्राथमिक आर्थिक मॉडेल व व्यवसाय आराखडा, निधी संरचना अहवाल, प्री-फिजिबिलिटी स्टडी तसेच अंतिम आर्थिक मॉडेल आणि अंतिम प्री-फिजिबिलिटी स्टडी अहवाल या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर संगणकीय सादरीकरण करण्यात आले आणि त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत ऊर्जा बचत उपाययोजनांसाठी आवश्यक असलेल्या गुंतवणुकीचे विविध पर्याय, निधी उभारणीची संरचना तसेच अंमलबजावणीची कार्यपद्धती याबाबत चर्चा करण्यात आली. ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांची अंमलबजावणी करताना दीर्घकालीन शाश्वतता, आर्थिक व्यवहार्यता आणि प्रत्यक्ष ऊर्जा बचतीचे मोजमाप यावर विशेष भर देण्याच्या सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. तसेच केवळ अहवाल आणि अभ्यासापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देऊन ऊर्जा बचतीची ठोस परिणामकारकता दिसून यावी, यासाठी वेळबद्ध नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

ऊर्जा बचत ही केवळ आर्थिक गरज नसून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. महापालिकेच्या इमारतींमध्ये आधुनिक ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर करून वीज खर्चात बचत करणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विविध संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पातून महापालिकेची ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली अधिक सक्षम, आधुनिक आणि परिणामकारक होईल, असा विश्वास आहे.

– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ऐन उन्हाळ्यात पिंपळगाव जोगा कालवा फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया

नारायणगाव (दैनिक संध्या) : येडगाव धरण जलाशय परिसरातील 40 कृषी वीज पंपाच्या सुमारे 8000 फूट लांबीच्या केबल अज्ञात चोरट्यांनी नुकत्याच चोरून नेल्या व पुन्हा जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा धरणाचा डावा कालवा काल पहाटे मोठे भगदाड पडून अचानक फुटल्याची घटना घडल्याने ऐन उन्हाळ्यात शेतकऱ्यांवर संक्रात आली आहे.पिंपळगाव जोगे कालव्याचे हजारो लिटर पाणी शेतकऱ्यांच्या धना, टोमॅटो, मिरची, ऊस, फुले तसेच काढणीस आलेल्या बाजरीच्या पिकात शिरल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्यातील माती पूर्णपणे वाहून गेली आहे. ऐन दुष्काळात कालवा फुटल्याने पाण्याची नासाडी झाल्याने शेतकरी संताप व्यक्त करत आहे. काही शेतकऱ्यांच्या विहिरींमध्येही कालव्याचे पाणी आणि चिखल शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या या पिकांचा पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

### नगराध्यक्षाकडून नालेसफाई कामाची पहाणी



जुन्नर(दैनिकसंध्या):जुन्नर शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाची तसेच नालेसफाईच्या पावसाळ्यापूर्व कामाची पाहणी जुन्नर शहराच्या नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी केली. ऐन पावसाळ्यात नागरिकांना शहरातील नाल्यांमधून वाहणारे पावसाचे पाणी व सांडपाणी याचा नाहक त्रास सहन करावा लागू नये यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना काजळे यांनी नगरपरिषदेच्या अधिकारि व कर्मचाऱ्यांना दिल्या. दरवर्षी जुन्नर शहर व परिसरात पावसाचे प्रमाण अधिक असते. शहरातील नाल्यांमधून हे पावसाचे पाणी कुकडी नदीच्या प्रवाहाला मिळते. मात्र बहुतांश वेळा नगरपरिषद प्रशासनाकडून वेळेवर नालेसफाई न केल्यामुळे पावसाचे पाणी नाल्यांमधून न वाहता रस्त्यावरून वाहत असल्याचे दिसून येते तसेच नालेसफाई वेळेवर न केल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. याची दखल घेत काजळे यांनी शहरातील नाल्यांची तसेच सांडपाणी व्यवस्थापनाची पाहणी केली. पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही समस्या निर्माण होऊ नयेत याची दक्षता घेण्याची सूचना काजळे यांनी प्रशासनाला केली. दरम्यान, कामकाजात दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे संकेतही त्यांनी यावेळी दिले.

### चाकण येथे शुक्रवारी समाधान शिबिर

चाकण (दैनिक संध्या) : नागरिकांच्या तक्रारींचे निवारण आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळावा आणि महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतिमान करण्याकरता चाकण येथे शुक्रवारी (दि.१५) छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत समाधान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. पुणे - नाशिक महामार्गावरील चाकण येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात शुक्रवारी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळात या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या समाधान शिबीरात शिबिर स्थळी पंधरा पेक्षा जास्त महसुली सेवा मिळणार आहेत. समाधान शिबिरात प्रामुख्याने प्रलंबित फेरफार, सातबारा मधील नावातील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा व आठ अ उताऱ्यांचे वाटप केले जाणार आहे. उत्पन्न, रहिवासी, आणि जातीचे प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र याची व्यवस्था होणार आहे. अकृषीक परवानगी, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा होणार आहे. नवीन व्यवस्थापनानुसार सनद प्रक्रियेची माहिती तसेच सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, तुकडे बंदी कायद्याच्या उल्लंघना बाबतच्या प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप, ई मोजणी अर्ज, अॅग्रीस्टँक आणि पीएम किसान नोंदणी, भूसंपादन व अ कृषी परवानगी प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत केली जाणार आहे. नागरिकांनी समाधान शिबिराला येताना मतदान कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड सोबत घेऊन येणे सक्तीचे करण्यात आले आहे. चाकण येथे शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या या समाधान शिबिराचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घेण्याचे आवाहन चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे व गटनेते नितीन गोरे यांनी केले आहे.

### शिरूर दुहेरी हत्याकांडातील आरोपी प्रदीप काळे याला जामीन

आळंदी (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे ( ठोंबरे वस्ती) येथे १८ मार्च १०२४ रोजी झालेल्या भीषण दुहेरी हत्याकांड आणि दरोड्याच्या प्रकरणातील आरोपी प्रदीप उर्फ कुटल्या आकाश काळे याला शिरूर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आरोपीचे वकील अॅड.अजित गंडाळ,अॅड.प्रसाद विरकर ,सहायक वकील अॅड.वेदांत जगताप,अॅड. कन्हैया काकडे यांनी ही माहिती दिली. शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील थोंबरे वस्ती येथे १८ मार्च २०२४ च्या मध्यरात्री चोरट्यांनी एका घरावर दरोडा टाकल होता. यावेळी झोपेत असलेल्या वृद्ध दाम्पत्यावर कोयता, लोखंडी सळई आणि लाकडी दांडक्याने निर्घृण हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात दाम्पत्याचा मृत्यू झाला .याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१०|२०१४ नुसार भा.दं.वि. कलम ३०२, ३९७, ३९६, ४१२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्यात आरोपीच्या वतीने अॅड.अजित गंडाळ व अॅड. प्रसाद विरकर यांनी न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला, युक्तिवाद करताना आरोपीच्या वकिलांनी स्पष्ट केले की आरोपी प्रदीप काळे याला १५ जून २०१५ रोजी अटक करण्यात आली होती. तो गेल्या ११ महिन्यांहून अधिक काळ कोठडीत होता. या गुन्ह्यात आरोपीचा थेट सहभाग असल्याचे दर्शवणारे कोणतेही प्रत्यक्ष पुरावे उपलब्ध नाहीत. असे आरोपीचे वकील अॅड.अजित गंडाळ यांनी युक्तिवाद केला. त्याना साह्य अॅड.वेदांत जगताप ,अॅड.कन्हैया काकडे यांनी केले हा युक्तिवाद ग्राह्य मानत सेशन कोर्ट शिरूर यांनी जामीन अर्ज मंजूर केला.

### भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन

नारायणगाव (दैनिक संध्या) : मुक्तादेवी चषक 2026 च्या भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मुक्तादेवी कबड्डी संघ आणि गुंजाळवाडी च्या ग्रामस्थांनी दिली. शनिवार दिनांक 16-5-2026 रोजी सायंकाळी 4 वाजता पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने उत्तर पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठा मुक्तादेवी चषक 2026 चे आयोजन गुंजाळवाडी येथील सर्व आजी-माजी खेळाडू व ग्रामस्थांनी आयोजन केले असून ही कबड्डी स्पर्धा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुंजाळवाडी येथील मैदानावर होणार आहे या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकाचे बक्षीस म्हणून रोख 15000 रुपये नारायणगाव चे उपसरपंच व राजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाबू पाटे यांनी ठेवले आहे. द्वितीय क्रमांकासाठी 11000 रुपयांचे बक्षीस प्रसिद्ध उद्योगपती प्रशांत दादा मच्छिंद्र डोंगरे यांनी तर तृतीय आणि चतुर्थ क्रमांकासाठी प्रत्येकी 7000 रुपयाचे बक्षीस गुंजाळवाडी चे तंटामुक्तीचे अध्यक्ष किरण दादा किसनराव सोलाट व द्राक्ष बागायतदार हेमंत भाऊ जाधव, डॅनी भाऊ ढवळे, निखिल वायकर ,गिरीश ढवळे यांनी ठेवले आहे.

# अंगणवाडी शिक्षिका सौ. सिमा आनंद मोहिते यांचे कार्य कौतुकास्पद

**नारायणगाव (दै. संध्या)**

धामारी तालुका शिरूर येथील अंगणवाडी शिक्षिका सौ. सिमा मोहिते यांना नुकतेच वाई सातारा येथील उद्योग उत्कर्ष संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

धामारी तालुका शिरूर येथील अंगणवाडी शिक्षिका सौ. सिमा आनंद मोहिते या सन २००६ पासून अंगणवाडी शिक्षका म्हणून कार्यरत आहेत. अंगणवाडी शिक्षिका म्हणून कार्यरत असताना गरोदर महिलांचा, बालकांचा आणि पालकांचा निकटचा त्यांचा संबंध आला. त्यातून त्यांनी आपलेपणाच्या भावनेने "आजचा बालक हा भविष्यातील देशाचा आदर्श नागरिक आहे"!.




'आवडीनुसार त्यांना प्रोत्साहन देऊन' त्यांच्याशी प्रेमाने वागल्यास त्यांच्या चेहऱ्यावरती सतत हसू असते."! "बालकांचे संगोपन शिक्षण , प्रेम, संयम आणि संस्कारावरती आधारित असते." 'त्यामुळे लहान मुलांना ओरडण्यापेक्षा, त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देऊन त्यांना चांगल्या सवयी लावणे"! हीच अंगणवाडी शिक्षिकेचे कर्तव्य

ही त्यांच्या मनाची संकल्पना आहे. त्या 20 वर्षा पासू अंगणवाडी शिक्षिका म्हणून उत्तम उत्तम काम करत आहेत. सौ. सिमा मोहिते या अंगणवाडी शिक्षिका म्हणून काम करत असताना त्यांचा विद्यार्थीपट हा 25 ते 30 च्या दरम्यान आहे. खरे तर! आज मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांची पटसंख्या घटते आहे. परंतु योग्य शिक्षण, योग्य दिशा, आणि पालकांचा सहवास करून घेतला की ,विद्यार्थ्यांची संख्या वाढते. याचे आदर्श उदाहरण म्हणजे धामारी येथील अंगणवाडी आहे .

सौ. सिमा मोहिते या विद्यार्थ्यांबरोबरच माता-भगिनींचे उपदेशन करतात .शिक्षण, आहार पोषण, प्राथमिक शिक्षण, गरोदर महिलांना बेबी किट, गरोदर मातांच्या वेळोवेळी बैठका घेऊन त्यांना बालसंगोपनाचे प्रशिक्षण देतात मातृ वंदना महिलेची पहिली खेप असेल तर, त्या महिलेला घर खर्चासाठी रु 6000 हजार रुपये मिळवून देण्यात अग्रक्रमाने त्यांचे नाव घेतले जाते. "या अंगणवाडीत शिकणाऱ्या मुलांच्या कलागुणांचा विकास व्हावा त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळावा.!' यासाठी स्वतः त्या उत्तम गायन करून किंवा मुलांच्या कलेने त्यांना शिकवण्याचा सातत्याने त्या प्रयत्नशील असतात.

सौ .सिमा मोहिते यांच्या या उत्तम कार्यामुळे धामारी गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य ग्रामपंचायत, वि. का. सोसायटी व इतरही संस्था आणि ग्रामस्थ या अंगणवाडीला मदत करतात. या त्यांच्या उत्तम कार्यामुळेच त्यांना यापूर्वी पंचायत समिती शिरुरने दोन वेळा आदर्श शिक्षिका व आदर्श अंगणवाडी म्हणून पुरस्कार देवून सन्मानित केले. तसेच महाराष्ट्रातील सामाजिक डी एस एस या संस्थेने सुद्धा त्यांचा सन्मान केलेला आहे. यावर्षी तर नुकताच वाई सातारा येथील उद्योग उत्कर्ष संस्थेने राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांना सन्मान करण्यात आले.

त्यांच्या या कर्तृत्वाबद्दल त्यांचे जुन्नर ,आंबेगाव ,खेड तालुक्यातील सर्व विविध सामाजिक संस्थांच्यावतीने अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## “आळंदीच्या विकासासाठी आवश्यक निधी देणार” : उपमुख्यमंत्री शिंदे

**आळंदी (दै. संध्या)**

“राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असलेल्या आळंदी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन सकारात्मक असून आवश्यक त्या विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल,” असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. आळंदी नगरपरिषदेच्या विविध विकासकामांच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली.यावेळी शहराच्या विकासासंदर्भातील विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आळंदी नगरपरिषदेच्या वतीने नवीन प्रशासकीय इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देणे, शहरातील प्रमुख रस्त्यांच्या विकास आराखड्यास मंजुरी देणे, आधुनिक स्ट्रीटलाईट व्यवस्था उभारणे, शहर सुशोभीकरण तसेच विविध मूलभूत नागरी सुविधांसाठी विशेष निधी देण्याची



मागणी करण्यात आली. दरवर्षी लाखो भाविकांचे आगमन होत असल्याने आळंदीतील नागरी सुविधा अधिक सक्षम व दर्जेदार करण्याची गरज असल्याचे नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिले. वाढती लोकसंख्या, भाविकांची संख्या आणि भविष्यातील विकास लक्षात घेता विशेष निधीची आवश्यकता असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित विकासकामांचे सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना दिल्या. आगामी काळात आळंदी शहरातील विविध विकासकामांना गती मिळेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ५०० टाळकऱ्यांच्या गजरात दुमदुमणार ज्ञानोबा-तुकोबांचे नाम

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

संत परंपरेचा सुगंध, अभंगांचा गजर आणि वारकरी भक्तीचा अविरत प्रवाह अनुभवण्याची पर्वणी हवेली तालुक्यातील वारकरी बांधवांना लाभणार आहे. हवेली तालुका वारकरी संप्रदायाच्या वतीने शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी श्रीक्षेत्र थेऊर येथे 'वासंतिक चंदनउटी मोगरा आरास वारकरी भजन व संमेलन' या भव्य धार्मिक व सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ ते रात्री ९ या वेळेत श्री महातारी माता मंदिर परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघणार असून, संत ज्ञानेश्वर-तुकारामांच्या नामगजराने थेऊर नगरी दुमदुमून जाणार आहे. हवेली तालुक्यातील तब्बल ७१ गावांतील वारकरी, भजनी मंडळे, किर्तनकार, प्रवचनकार, गायक, वादक तसेच महिला-पुरुष दिंड्यांचा उत्स्फूर्त सहभाग या सोहळ्यात लाभणार आहे. सुमारे ५०० टाळकऱ्यांच्या एकसुरात होणाऱ्या हरिनामाच्या गजरातून वारकरी परंपरेचे सामर्थ्य आणि भक्तिभावाचे दर्शन घडणार



आहे. मोगऱ्याच्या सुगंधाने आणि चंदनउटीच्या आरासीत सजणारा हा सोहळा अध्यात्म, संस्कृती आणि समाजप्रबोधनाचा सुंदर मिलाफ ठरणार आहे. 'या रे या रे लहान थोर, याति भलते नारीनर' या संत तुकाराम महाराजांच्या अभंग ओळींचा प्रत्यय देत समाजातील सर्व स्तरांतील भाविकांना एकत्र आणण्याचा संदेश या संमेलनातून दिला जाणार आहे. वारकरी परंपरेतील समता, बंधुता आणि भक्तीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या भक्तिमय सोहळ्यास सिद्ध सद्गुरु शांतिनाथजी महाराज, श्रीक्षेत्र पंढरपूर यांचे आशीर्वाद लाभले असून मार्गदर्शक म्हणून गुरुवर्य महादेव दामोदर काकडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, श्रीक्षेत्र आळंदी, संत तुकाराम महाराज संस्थान देहू, धर्मवीर संभाजी महाराज मंदिर तुळापूर, चिंचवड देवस्थान ट्रस्ट, श्रीराम मंदिर देवस्थान उरुळी कांचन, श्री वाघेश्वर महाराज मंदिर वाघोली, श्रीगुरु हरिबाबा दिंडी परंपरेचे वारकरी पुणे तसेच श्री सद्गुरू दौलत बाबा मठ ट्रस्ट शिंदेवाडी यांचे सहकार्य या कार्यक्रमास लाभत आहे. समस्त ग्रामस्थ श्रीक्षेत्र थेऊर, चिंतामणी भजनी मंडळ, महातारी आई भजनी मंडळ आणि चिंतामणी प्रासादिक दिंडी यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे निमंत्रक ह.भ.प. आनंदमहाराज विश्वनाथ तांबे हे किर्तनकार व प्रवचनकार म्हणून परिचित असून त्यांनी मराठी व शिक्षणशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. अखिल भारतीय वारकरी मंडळ महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष तसेच चिंचवड देवस्थान ट्रस्टचे माजी विश्वस्त म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

सोहळ्यास खासदार डॉ.अमोल कोल्हे, माजी आमदार अशोक पवार, कामगार नेते तात्यासाहेब रामचंद्र काळे, पुणे जिल्हा परिषदेचे समाजकल्याण विभागाचे सभापती जितेंद्र बडेकर, जिल्हा परिषद सदस्या कोमल संदेश आव्हाळे, जिल्हा परिषद सदस्य किरण साकोरे, हवेली तालुका पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, ह.भ.प.नवनाथ महाराज काकडे, पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच आमदार ज्ञानेश्वर कटके, आमदार बापूसाहेब पठारे, जिल्हा परिषद अध्यक्ष बीरधवल उर्फ बाबा जगदाळे, जिल्हा परिषद सदस्या सुरेखा हरगुडे, रुपाली कोंडे, उपसभापती विद्या गायकवाड, मोनिका कंद, सुषमा मुरकुटे, अमोल टेकाळे आदी मान्यवरांचीही उपस्थिती लाभणार आहे. भक्ती, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा हा भक्तिरंगमय सोहळा हवेली तालुक्याच्या सांस्कृतिक परंपरेत ऐतिहासिक पर्व ठरेल, अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सुसज्ज शाळा इमारत आवश्यक : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

### आळंदी नगरपरिषद शाळेच्या इमारतींच्या दुरुस्ती व सुशोभीकरण विकासकामांचा शुभारंभ

**आळंदी (दै. संध्या)**

विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षणासोबतच सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज वातावरण मिळणे ही काळाची गरज असून, त्यातूनच शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावतो, असे प्रतिपादन आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले. आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक १, २ व ३ मधील इमारतींच्या दुरुस्ती व सुशोभीकरण विकासकामांचा शुभारंभ नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

नगरपरिषद शाळेच्या इमारतीचे आधुनिकीकरण, स्वच्छता व आवश्यक दुरुस्तीमुळे विद्यार्थ्यांना




अधिक चांगले शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार असल्याचे नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी सांगितले. यावेळी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, खुशी बोरुंदिया, पुजा घुंडरे, ऋतुजा घुंडरे, ऋतुजा तापकीर, नगरसेवक दिनेश घुले, सुनिल घुंडरे, सागर कुऱ्हाडे, माजी सभापती श्रीधर कुऱ्हाडे यांच्यासह शिक्षक वृंद व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरपरिषदेकडून शहरातील शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी विविध विकासकामे हाती घेण्यात येत असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असल्याचे शिक्षण समिती सभापती खुशी सागर बोरुंदिया यांनी सांगितले.

## दारूच्या पैशावरून घोडेगावात खून; पोलिसांची झटपट कारवाई

**घोडेगाव (दै. संध्या)**

घोडेगाव पोलीस ठाणे हददीत 12 मे रोजी सकाळी घोडेगाव गावचे हददीतील देशी दारूच्या दुकानाच्या गेटजवळ झालेल्या मारहाणीत राजेंद्र रघुनाथ सहाने यांचा ग्रामीण रुग्णालयात उपचार दरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी मारहाण करून मृत्यूस कारणीभूत असणारे महेंद्र सुभाष शिंदे ( रा. घोडेगाव) याला या गुन्ह्यात घोडेगाव पोलिसांनी अटक केली आहे. राजेंद्र सहाणे हे बेशुध्द अवस्थेत पडलेला असलेबाबत माहिती घोडेगाव पोलिसांना मिळाली होती. घोडेगाव पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी जावुन सदर व्यक्तीची ओळख पटवुन रूग्णालयात दाखल केले. त्यावेळी सहाणे यांचा मृत्यु झाल्याचे माहिती मिळाली होती. त्यावेळी मृत्यु बाबत संशय आल्याने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक करून तसेच मयताचे शवविच्छेदन कार्यवाही मंचर येथे केले आहे. सदर अहवाल तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व साक्षीदार यांचेकडे तपासामध्ये मयत व्यक्तीस एका संशयित इसमाने मारहाण केल्यामुळे त्याचा मृत्यु झाल्याचे दिसुन आले आहे.

## दौंडमधील आत्महत्याप्रकरणी तेरा जणांविरुद्ध गुन्हा

**दौंड (दै. संध्या)**

शहरातील ज्येष्ठ नागरिक विवेक गटणे (वय ७०) यांनी आर्थिक फसवणुकीला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी दौंड पोलिसांनी तेरा जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विवेक गटणे यांची दीड कोटी रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक करण्यात आली होती. या आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून त्यांनी सोमवारी (ता. ११) गळफास घेऊन आत्महत्या केली. मृत्यूपूर्वी गटणे यांनी एका वहित त्यांना त्रास देणाऱ्या व्यक्तींची नावे तसेच आर्थिक व्यवहारांची सविस्तर नोंद करून ठेवली होती. या नोंदीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या प्रकरणी राजू भीमराव बारस्कर, संजय भीमराव बारस्कर, प्रकाश आवाजी



भोसले, आरिफ शमसुद्दीन शेख, शंकर रमेश वाघमारे, अक्तर अहमद शेख (सर्व रा. दौंड) तसेच आदित्य सुधीर जगताप (रा. पुणे) यांच्यासह इतर आरोपींचा समावेश आहे. तसेच पुणे व मुंबई येथील खासगी वित्तीय कंपनीतील एका महिलेसह एकूण सहा जणांचाही समावेश असल्याची माहिती आहे.

आरोपींनी गटणे यांच्याकडून रोख रक्कम, सोन्याचे दागिने व इतर मौल्यवान वस्तू घेतल्या, मात्र त्या परत न करता त्यांना मानसिक व शारीरिक त्रास दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# पुरंदर किल्ल्यावर आज शिवपुत्र शंभू जन्मोत्सव

## धर्मवीर संभाजीमहाराज जयंतीनिमित्त विविध उपक्रम

**पुरंदर (दै. संध्या)**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त पुरंदर प्रतिष्ठान व संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, पंचायत समिती पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ व १४ मे रोजी ऐतिहासिक किल्ले पुरंदर येथे भव्य शिवपुत्र शंभू जन्मोत्सव सोहळा आयोजित केला आहे. सोहळ्यास शिवशंभू भक्तांना उपस्थित राहण्याचे आवाहन पुरंदर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत पाटणे यांनी केले आहे. दोन दिवसीय सोहळ्याची सुरुवात सायंकाळी ६ वाजता श्रीक्षेत्र नारायणपूर येथील प. पू. पोपट महाराज टेंबे स्वामी यांच्या हस्ते संभाजी महाराज मूर्ती पूजन व ज्योत प्रज्वलनाने होणार आहे. किल्ले पुरंदर येथे कार्यक्रमास प्रारंभ होईल. सायंकाळी ७



वाजता पुरंदर गडावर शंभुराजे महानाट्य तसेच ज्योती घेऊन येणाऱ्या मंडळांचे स्वागत करण्यात येणार आहे. रात्री महाप्रसादाचे आयोजन केले. गुरुवारी (दि. १४) सकाळी ७ वाजता पुरंदरेश्वर, केदारेश्वर, शिवरायांच्या मूर्तीचा अभिषेक होणार आहे. सकाळी ८ वाजता छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज जन्मोत्सव पाळणा पार पडणार असूनन सोहळा प्राथमिक शिवकालीन मर्दानी खेळ, घोडेस्वारीचे प्रात्यक्षिक सकाळी ९.३० वाजता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शासकीय अधिकारी, शिवशंभू भक्त व मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष मेळावा आयोजित केला आहे. सकाळी १० वाजता मुख्य शासकीय कार्यक्रमांतर्गत छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याचे अनावरण मान्यवरांची भाषणे होणार आहेत. सकाळी ११ वाजता ढोल- ताशा गजर, लेझीम पथक, शिवकालीन मर्दानी खेळ, घोडेस्वारी प्रात्यक्षिक, रक्तदान शिबिर, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सकाळी ११.३० वाजता छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर व्याख्यान व पोवाड्यांचा कार्यक्रम सादर होणार आहे. दिवसभर सर्व शिवभक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली आहे. शिक्षक संघ, पंचायत समिती, तळागाळातील संघटना, संभाजी ब्रिगेड यांचा सहभाग राहणार आहे. कार्यक्रमादरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रक्तदान शिबिरही आयोजित केले असून शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करावे, असे आवाहन पुरंदर प्रतिष्ठान व संभाजी ब्रिगेडच्या वतीने केले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे...



## मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी येथे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन 2026 उत्साहात साजरा

भोसरी (दैनिक संध्या) : मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी येथे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन २०२६ मोठ्या उत्साहात आणि कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला. रुग्णसेवा, आपत्कालीन वैद्यकीय मदत आणि आरोग्य व्यवस्थेमध्ये परिचारिकांचे योगदान अधोरेखित करत त्यांच्या समर्पणाचा गौरव करण्यात आला. "आवर नर्सेस, आवर फ्युचर – एम्पॉवर्ड नर्सेस सेव्ह लाइव्ह्स" या प्रेरणादायी संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन हॉस्पिटलच्या चौथ्या मजल्यावरील सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मान्यवर पाहुणे, हॉस्पिटल व्यवस्थापन, डॉक्टर्स, परिचारिका कर्मचारी आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका नम्रताताई लोंढे उपस्थित होत्या, तर प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. कीर्ती माने यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविली. यावेळी डॉ. पवन वाखरे, डॉ. श्रीरंग कुलकर्णी, डॉ. वर्षा रांगेरी आणि डॉ. दत्तात्रय कुलकर्णी हे मान्यवरही उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना गीत, स्वागतपर भाषण आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर विविध मान्यवरांनी परिचारिकांच्या अथक सेवाभावाचे कौतुक करत आरोग्य व्यवस्थेमध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले. रुग्णांच्या उपचारांबरोबरच मानसिक आधार देण्यातही परिचारिका महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले. मान्यवरांनी मेडिकव्हर हॉस्पिटलच्या परिचारिका टीमचे विशेष कौतुक करत रुग्णसेवेतील उच्च दर्जा, संवेदनशीलता आणि सेवाभाव यांचे अभिनंदन केले. कुशल आणि सक्षम परिचारिका आरोग्यसेवेचे भविष्य अधिक मजबूत बनवतात, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## बर्जर पेंट्स इंडिया लिमिटेडचा तिमाही आणि वर्षासाठी आर्थिक अहवाल

पुणे (दैनिक संध्या) : बर्जर पेंट्स इंडिया लिमिटेड चा ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी आर्थिक अहवाल जाहीर करण्यात आला. एकत्रित तिमाही अहवालाची वैशिष्टे लक्षात घेता ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत कामकाजातून मिळणारा महसूल रु. २,८६८.० कोटी होता. त्यात मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीतील रु. २,७०४.० कोटींच्या तुलनेत ६.१ टक्के वाढ दिसून आली. निव्वळ नफा रु. ३३५.३ कोटी होता. त्यात मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीतील रु. २६२.९ कोटींच्या तुलनेत २७.५ टक्के वाढ दिसून आली. एकत्रित वार्षिक अहवालाची वैशिष्ट्यांमध्ये ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षासाठी कामकाजातून मिळणारा महसूल रु. ११,८८०.३ कोटी होता. त्यात मागील आर्थिक वर्षातील रु. ११,५४४.७ कोटींच्या तुलनेत २.९ टक्क्यांची वाढ दिसून आली. निव्वळ नफा रु. १,१२८.० कोटी होता. त्यात मागील आर्थिक वर्षातील रु. १,१८२.८ कोटींच्या तुलनेत ४.६ टक्क्यांची घट दिसून आली.



## तोशिबा ट्रान्समिशन अँड डिस्ट्रिब्युशन सिस्टम्सला प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार

हैदराबाद (दैनिक संध्या) : तोशिबा ट्रान्समिशन अँड डिस्ट्रिब्युशन सिस्टम्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड ला आर्थिक वर्ष 2024-25 साठी 57व्या इइपीसी इंडिया नॅशनल अवॉर्ड्समध्ये 'उत्कृष्ट निर्यात कामगिरीसाठी राष्ट्रीय पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले आहे. कंपनीने हा प्रतिष्ठित पुरस्कार सातव्यांदा मिळवला आहे. भारताच्या अभियांत्रिकी निर्यातीला चालना देण्यासाठी आणि जागतिक उत्पादन क्षेत्रातील स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी कंपनीने दिलेल्या सातत्यपूर्ण योगदानावर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे. गट 10: इलेक्ट्रिकल मशिनरी आणि पार्ट्स - लार्ज एंटरप्राइझ या श्रेणीमध्ये टीटीडीआयने हा सर्वोच्च बहुमान मिळवला आहे. दिल्लीचे पर्यावरण मंत्री सरदार मनजिंदर सिंह सिरसा यांच्या हस्ते टीटीडीआयचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. हिरोशी फुरुता यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ही मान्यता सरकारच्या मेक इन इंडिया व्हिजनशी सुसंगत असलेल्या, जागतिक उत्पादन व निर्यात केंद्र म्हणून भारताच्या वाढत्या भूमिकेला अनुसरून, भारतातून उच्च-गुणवत्तेची, जागतिक स्तरावर स्पर्धात्मक वीज पारेषण आणि वितरण सोल्यूशन्स देण्यासाठीच्या टीटीडीआयच्या वचनबद्धतेवर भर देते. कंपनीच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारताना टीटीडीआयचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. हिरोशी फुरुता म्हणाले, "ईईपीसी इंडियाकडून पुन्हा एकदा हा प्रतिष्ठित सन्मान प्राप्त झाल्यामुळे आम्हाला अतिशय आनंद होत आहे. हा टप्पा मेक इन इंडिया उपक्रमाप्रती तोशिबाची अढळ वचनबद्धता आणि उच्च दर्जाच्या टी अँड डी उपकरणांसाठी भारताला जागतिक उत्पादन केंद्र म्हणून स्थापित करण्यातील आमचे यश दर्शवतो. तोशिबा ग्रुपच्या जागतिक पारेषण आणि वितरण व्यवसायाचे मुख्य केंद्र म्हणून टीटीडीआय भारतातून जगाला प्रगत आणि विश्वासार्ह वीज उपाय प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आमचे भारतात तयार झालेले ट्रान्सफॉर्मर्स आणि स्विचगिअर्स आता 50 पेक्षा जास्त देशांमधील पायाभूत सुविधांना ऊर्जा देत आहेत. नाविन्यपूर्ण संशोधन व अभियांत्रिकी उत्कृष्टतेद्वारे जागतिक हरित ऊर्जा संक्रमणास गती देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

## जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना नसल्याने ग्रामीण भागात संताप

तुमसर (दैनिक संध्या) : देशभरात सुरू असलेल्या जनगणना आणि सर्वेक्षण प्रक्रियेत इतर मागासवर्गीय (ओबीसी) नागरिकांसाठी स्वतंत्र रकाना नसल्याची बाब समोर आल्याने ग्रामीण भागात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. ओबीसी समाजाची अचूक आकडेवारी समोर येणार कशी, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सध्या गावागावांत प्रशासनाकडून प्रत्यक्ष सर्वेक्षण सुरू आहे. मात्र, या प्रक्रियेत अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांच्यासाठीच स्वतंत्र नोंदीची व्यवस्था असल्याचे दिसून येत आहे. ओबीसी प्रवर्गातील नागरिकांची गणना सामान्य प्रवर्गात किंवा इतर स्तरावर होत असल्याने त्यांच्या नेमक्या संख्येची नोंद होत नसल्याची भावना व्यक्त केली जात आहे. आम्ही आमची जात सांगण्यास तयार आहोत; पण अर्जात तसा कॉलमच नसेल तर नोंद होणार कशी? असा संतप्त सवाल ग्रामीण भागातील नागरिकांनी उपस्थित केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाचा मुद्दा सध्या न्यायप्रविष्ट असताना, अचूक आकडेवारी नसल्याचा फटका ओबीसी समाजाला बसत असल्याची चर्चा आहे. ओबीसी समाज हा देशातील मोठा घटक असून, त्यांची स्वतंत्र शिरगणती झाल्याशिवाय न्याय्य हक्क आणि विकासाचा मार्ग मोकळा होणार नाही, असे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. अनेक गावांतील ग्रामसभांमध्ये या विषयावर चर्चा सुरू झाली असून, जनगणनेच्या अर्जात तातडीने बदल करून ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम समाविष्ट न केल्यास सर्वेक्षणावर बहिष्कार टाकण्याचा इशारा विविध संघटनांनी दिला आहे.

# सोनी मॅक्सवर लालोचा वर्ल्ड टीव्ही प्रीमियर १७ मे रोजी दुपारी १ वाजता

### सोनी सबच्या पुष्पा इम्पॉसिबलमध्ये खास कलाकारांची साथ

मुंबई (दै. संध्या)

सोनी सबची पुष्पा इम्पॉसिबल मालिका प्रेक्षकांसाठी एक खास आणि हृदयस्पर्शी भाग घेऊन येत आहे. ब्लॉकबस्टर गुजराती चित्रपट लालो – कृष्ण सदा सहायतेचा कलाकार वर्ग मालिकेत विशेष उपस्थिती दाखवणार आहे. हा भाग चित्रपटाच्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरच्या आधी दाखवला जाणार आहे. बॉक्स ऑफिसवर इतिहास घडवत ₹100 कोटींचा टप्पा पार करणारा पहिला गुजराती चित्रपट ठरलेला लालो आता 17 मे रोजी दुपारी 1 वाजता सोनी मॅक्सवर हिंदी आणि गुजराती अशा दोन्ही भाषांमध्ये प्रेक्षकांसाठी उपलब्ध होणार आहे. या विशेष भागांमध्ये पुढील आठवड्यात पुष्पा (करुणा पांडे)चा भावनिक प्रवास अध्यात्मिक वळण घेतो. तिला 'लालो' चित्रपटातील कृष्ण (श्रुहद गोस्वामी) आणि तुलसी (रीवा रच्छ) यांच्याकडून अनपेक्षित आधार आणि मार्गदर्शन मिळतं. मदर्स डेच्या दिवशी, मुलांची आठवण काढत एकटी झालेली पुष्पा कृष्णाच्या घरी रात्र घालवते. तिथे तिची भेट किसना नावाच्या एका कोमल मुलाशी होते. तो तिला "मैया" म्हणतो, गरम काठियावाडी चहा देतो आणि आपल्या बासरीच्या सुरांनी तिच्या मातृत्वाच्या भावनांना पुन्हा जागं करतो. मात्र सकाळी किसना रहस्यमयरीत्या गायब होतो आणि मंदिरातील उत्सवात पुष्पाला जाणवतं की तो प्रत्यक्षात भगवान कृष्ण होते, जे तिला आधार देण्यासाठी आणि दैवी प्रेम कधीही सोडून जात नाही हे आठवण करून देण्यासाठी आले होते. अशा प्रकारे 'पुष्पा इम्पॉसिबल' आणि 'लालो'ची दुनिया एकत्र येऊन श्रद्धा, भावना आणि आई-मुलांच्या नात्याचा सुंदर संगम दाखवते. या विशेष भागाबद्दल बोलताना 'पुष्पा इम्पॉसिबल'मध्ये पुष्पाची भूमिका साकारणाऱ्या करुणा पांडे म्हणाल्या, "पुष्पा इम्पॉसिबल नेहमीच भावना, नाती आणि दैनंदिन जीवनातील सौंदर्य साजरं करत आली आहे. त्यामुळे 'लालो'सोबतची ही जुळवाजुळव खूप नैसर्गिक आणि खास वाटते. चित्रपटाला प्रेक्षकांनी दिलेलं प्रेम अफाट आहे आणि त्यांचा कलाकार वर्ग पुष्पाच्या दुनियेत स्वागत करणं खूप आनंददायी होतं. दोन्ही कथांमध्ये सांस्कृतिक उबदारपणा आणि भावनिक नातं आहे, आणि मला खात्री आहे की प्रेक्षकांना हा संगम खूप आवडेल."



लालो मधील कृष्णाची भूमिका श्रुहद गोस्वामी पुढे म्हणाले, "लालो आमच्यासाठी अत्यंत खास प्रवास ठरला आहे. चित्रपटाला मिळालेलं प्रेम खूपच जबरदस्त आहे. 'पुष्पा इम्पॉसिबल'चा भाग होणं आणखी संस्मरणीय ठरलं कारण मालिकेतही तीच उबदारता, साधेपणा आणि भावनिक नातं आहे जे प्रेक्षकांनी आमच्या चित्रपटात आवडलं. आम्ही खूप उत्सुक आहोत की प्रेक्षकांना हा सुंदर संगम पाहायला मिळेल आणि सोनी मॅक्सवर हिंदी आणि गुजराती भाषेत चित्रपटाचा टेलिव्हिजन प्रीमियर आपल्या कुटुंबासोबत अनुभवता येईल." लालो – कृष्ण सदा सहायतेचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर 17 मे रोजी दुपारी 1 वाजता, फक्त सोनी मॅक्सवर पाहायला विसरू नका.

# एचडीएफसी बँकेच्या व्हॉट्सअॅप चॅट बँकिंग ने पूर्ण केला १ कोटी युनिक मंथली ॲक्टिव्ह युझर्सचा महत्त्वपूर्ण टप्पा

मुंबई (दै. संध्या)

एचडीएफसी बँकेच्या व्हॉट्सअॅप चॅट बँकिंग मंचाने त्यांच्या वापरातील एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून या मंचाच्या माध्यमातून ३० दिवसातील ॲक्टिव्ह युझर्स ची संख्या ही १ कोटी तर ९० दिवसांतील ॲक्टिव्ह युझर्स ची संख्या ही ३१ मार्च २०२६ रोजी २ कोटी पेक्षा अधिक झाली आहे. आता या मंचाचे ४ कोटींहून अधिक नोंदणीकृत ग्राहक असून ही संख्या बँकेच्या एकूण ग्राहक संख्येच्या जवळजवळ ४० टक्के आहे. वापरकर्त्यांमधील वाढीसह व्यवहारातही २० टक्क्यांनी वाढ झाल्याने अधिकाधिक लोकांची आवड यातून दिसून येते.

आज एचडीएफसी बँकेकडून व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून सर्वाधिक सर्वसमावेशक सेवा देण्यात येतात. १९ विविध उत्पादनां सह २२५ सेवा या मंचावरुन देण्यात येत असून रोजच्या बँकिंग गरजांसह व्यवहार आणि आठवण करुन देण्यास योग्य सेवांचे



अलर्ट्स देण्यात येतात. परिणामी ही सेवा क्षेत्रातील अत्याधुनिक संभाषणात्मक बँकिंग सेवा पध्दतीं पैकी एक ठरली आहे.

एचडीएफसी बँकेने सुरुवातीलाच ओळखले होते की, संवादात्मक इंटरफेस हे केवळ साध्या संवादांपुरते मर्यादित न राहता, खरेदी, जेवण मागवणे आणि दैनंदिन व्यवहारांसारख्या व्यापारासाठी शक्तिशाली प्लॅटफॉर्म म्हणून विकसित होत आहेत. हा बदल ओळखून, बँकेने २०२२ मध्ये चॅट बँकिंग सुरू केले आणि त्याला मूलभूत बँकिंग गरजांसाठी एक सोयीस्कर सेवा माध्यम म्हणून स्थापित केले, तसेच बँकिंगला थेट ग्राहकांच्या दैनंदिन डिजिटल सवयींमध्ये आणले.

उत्पादनांचा स्वीकार वाढवण्यासाठी, बँकेने सातत्याने नाविन्यपूर्ण उत्पादन रचनेवर लक्ष केंद्रित केले आहे. बँकेने उद्योगात प्रथमच वापरल्या जाणाऱ्या अनेक सुविधा सादर केल्या आहेत, ज्यात व्हॉइस नोट वर आधारित इनपुटचा समावेश आहे, ज्यामुळे ग्राहक हिंदी, इंग्रजी किंवा हिंग्लिशमध्ये सहजपणे संवाद साधू शकतात. तसेच, कोअर बँकिंग सिस्टीममधून इंटीग्रेटेड सर्व्हिस अलर्ट्स सक्षम करणाऱ्या जागतिक स्तरावरील पहिल्या काही बँकांपैकी ही एक सेवा आहे, जिथे अधिक गुंतागुंतीच्या प्रश्नांसाठी एआय-शक्तीवर चालणारे बॉट्स आणि मानवी एजंट यांचा एकत्रित उपयोग केला जातो.


सोपेपणात अधिक भर घालण्यासाठी बँकेने प्रथमच कनेक्ट टू आरएम वैशिष्ट्य सुरु केले, यामुळे ग्राहक रिलेशनशिप मॅनेजरची माहिती पाहून कॉलबॅक करण्याची विनंती लगेच करु शकतील. नुकतीच त्यांनी क्विक एफडी आणि कन्व्हर्ट टू ईएमआय सारख्या स्थानिक प्रवासाची सुरुवात केली असून यामुळे संपूर्ण प्रक्रिया ही केवळ तीन टप्प्यात होऊन किमान ड्रॉप ऑफ्स मध्ये काम होऊ शकते.

या महत्त्वपूर्ण टप्प्या विषयी बोलतांना एचडीएफसी बँकेच्या पेमेंट्स आणि डिजिटल बँकिंग चॅनल चे प्रमुख रजनीश प्रेमानंद प्रभू यांनी सांगितले " मंथली ॲक्टिव्ह युझर्स चा १ कोटींचा टप्पा ओलांडणे हा आमच्या डिजिटल प्रवासातील एक महत्त्वाचा क्षण आहे. एका साध्या सर्व्हिस इंटरफेसच्या रूपात सुरू झालेली ही प्रक्रिया आता एका संपूर्ण संवादात्मक बँकिंग इकोसिस्टममध्ये विकसित झाली आहे. ग्राहकांच्या दैनंदिन सेवा आणि मोठ्या रकमेच्या व्यवहारांसाठी अधिकाधिक लोक आता चॅटचा पर्याय निवडत आहेत. ग्राहक दररोज वापरत असलेल्या प्लॅटफॉर्मवर बँकिंगला अधिक ग्राहक-केंद्रित, सोपे आणि सुलभ बनवण्यावर आमचे लक्ष केंद्रित करत आहोत."

ही व्याप्ती एका केंद्रित ३६०-अंश धोरणामुळे शक्य झाली आहे, ज्यामध्ये ग्राहकांच्या मानसिकतेचा उपयोग करून लक्ष्यित सेवा सूचना देणे, मोबाईल बँकिंग आणि पे झॅप सारख्या डिजिटल टचपॉइंट्सवर क्रॉस-चॅनल कॉल्स टू ॲक्शनद्वारे चॅट बँकिंगला प्रोत्साहन देणे, सुधारित वारंवारता आणि आकर्षक क्रिएटिव्ह्जद्वारे संवाद अधिक प्रभावी करणे, आणि रिअल-टाइम एनपीएस ट्रॅकिंग आणि ग्राहकांच्या अभिप्रायाच्या आधारावर ग्राहक अनुभवांमध्ये सतत सुधारणा करणे यांचा समावेश आहे.

यावेळी बोलतांना भारतातील मेटाच्या बिझनेस मेसेंजिग चे संचालक रवी गर्ग यांनी सांगितले " व्हॉट्सअॅप आता व्यवसाय आणि ग्राहक एकमेकांशी कशा प्रकारे संवाद साधत आहेत या मध्ये बदल घडवत असून अशा बदला मुळे तसेच या महत्त्वपूर्ण टप्प्यांमुळे कशा प्रकारे अर्थपूर्ण मुल्य आणि समृध्द अनुभवासाठी मेसेंजिंगचा कसा उपयोग होतो हे दिसून येते. एचडीएफसी बँकेने व्हॉट्सअॅपचा योग्य वापर करुन सोपेपणा आणि सुरक्षित बँकिंगचा अनुभव ग्राहकांना देऊ करत असल्याचे पाहून आम्ही खूपच उत्साही आहोत."

> एचडीएफसी बँक नवीन उत्पादन श्रेणींसह आपल्या चॅट बँकिंग क्षमतांचा आणखी विस्तार करण्याची योजना आखत आहे, ज्यामुळे चॅट बँकिंगला ग्राहकांसाठी पसंतीच्या स्वयं-सेवा माध्यमांपैकी एक बनवण्याचे त्यांचे उद्दिष्ट अधिक बळकट होऊ शकेल.




# ॲबॉटतर्फे इन्शुअर स्ट्रेंथ प्रो लाँच

पुणे (दै. संध्या)

जागतिक हेल्थकेअर कंपनी ॲबॉटने आज इन्शुअर स्ट्रेंथ प्रो लाँच केल्याची घोषणा केली. हे वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेले पोषण मिश्रण आहे जे ताकद आणि एकूण आरोग्य टिकवण्यासाठी स्नायू, हाडे, हृदय, रक्त पेशी, रोगप्रतिकारक शक्ती, मेटाबॉलिझम आणि नर्व्हस सिस्टीम या सात महत्त्वाच्या अंगांना पोषण देण्यास मदत करते. वय वाढलेल्या प्रौढांमध्ये शरीरात नैसर्गिक बदल होतात ज्यामुळे ताकद, स्टॅमिना, मेटाबॉलिझम आणि रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होतो. सक्रिय, ऊर्जावान आणि स्वतंत्र राहण्यासाठी शरीरातील अनेक घटक एकत्र काम करणे आवश्यक असते. संशोधनानुसार ४० ते ८० वर्षांच्या दरम्यान हाडांची घनता, मेटाबॉलिझम आणि रोगप्रतिकारक शक्ती हळूहळू कमी होत जाते तसेच प्रौढांमध्ये स्नायूंच्या मासमध्ये 33% पर्यंत घट होते.

भारतात अजूनही पोषणातील मोठ्या प्रमाणात कमतरता आहे, अनेक राज्यांमध्ये आहारात २५ पैकी ११ आवश्यक पोषक घटकांचा अभाव दिसतो, याचे प्रमुख कारण आहारातील विविधतेचा अभाव आहे. या बदलांचा आणि पोषणातील कमतरतेचा विचार करून इन्शुअर स्ट्रेंथ प्रो सात महत्त्वाच्या आरोग्य क्षेत्रांना पोषण देतो, ज्यामुळे लोकांना अधिक मजबूत वाटते. "वय वाढल्यावर ताकद टिकवणे हे एका घटकावर अवलंबून नसते, तर शरीरातील अनेक कार्ये एकमेकांना सहाय्य करत असतात," असे ॲबॉटच्या भारतातील न्यूट्रिशन व्यवसायाचे जनरल मॅनेजर अनिर्बाण बसू म्हणाले. "आमचे वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेले इन्शुअर स्ट्रेंथ प्रो प्रौढांना त्यांच्या बदलत्या पोषण गरजा पूर्ण करण्यात मदत करते, विशेषतः पोषणातील सामान्य कमतरतेच्या पार्श्वभूमीवर, ज्यामुळे ते वय वाढल्यावरही सक्रिय, आत्मविश्वासपूर्ण आणि गुंतलेले राहू शकतात." वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेले इन्शुअर स्ट्रेंथ प्रो प्रौढांच्या बदलत्या पोषण गरजा पूर्ण करण्यासाठी ३१ पोषक घटक पुरवते, ज्यात ३० ग्रॅम उच्च दर्जाचे प्रोटीन आहे. यात हाडे, हृदय, रक्त पेशी, रोगप्रतिकारक शक्ती, मेटाबॉलिक सिस्टीम आणि नर्व्हस सिस्टीमला सहाय्य करणारे आवश्यक पोषक घटक आहेत. ॲबॉटच्या भारतातील न्यूट्रिशन व्यवसायाच्या मेडिकल आणि सायंटिफिक डायरेक्टर डॉ. प्रीती ठाकोर यांनी स्पष्ट केले: "वय वाढल्यावर पोषणाची भूमिका अनेकांना वाटते त्यापेक्षा खूप मोठी असते. शरीराच्या गरजा वेळेनुसार बदलतात आणि संतुलित पोषण दृष्टिकोन ताकद आणि प्रतिकारशक्ती टिकवण्यास मदत करू शकतो, फक्त स्नायूंच्या आरोग्यापुरते मर्यादित न राहता." उच्च दर्जाचे आणि पुरेशा प्रमाणात प्रोटीनसोबत या फॉर्म्युलेशनमध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन के, फॉस्फरस आणि झिंक आहेत जे हाडे सामान्य ठेवण्यास मदत करतात.

## 'नीट'च्या खेळखंडोब्यानंतर विद्यार्थ्यांनी वक्त केला संताप

नागपूर (दै. संध्या)

नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून (एनटीए) नीट-यूजी २०२६ परीक्षा रद्द करण्यात आल्याने देशभरातील लाखो विद्यार्थ्यांसह नागपूर आणि विदर्भातील विद्यार्थ्यांमध्येही निराशा पसरली असून, संताप व्यक्त केला जात आहे. परीक्षा दिल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साह होता व चांगले गुण मिळण्याचा विश्वासही होता. 'ॲन्सर की' मिळाल्यानंतर हा विश्वास वाढला होता. एकतर अनेक महिन्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आणि पुन्हा तयारी करावी लागण्याचा मानसिक ताण व संताप विद्यार्थ्यांसह पालकांमध्येसुद्धा आहे. नागपुरात १५ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी 'नीट' दिली होती. विद्यार्थ्यांनी दिवसरात्र कष्ट घेऊन परीक्षा दिली होती. मात्र, आता पुनर्परीक्षेच्या निर्णयामुळे मानसिक तणाव वाढला आहे. सतत बदलणाऱ्या परिस्थितीमुळे अभ्यासाची लय बिघडत असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. ३ मे रोजी झालेल्या परीक्षेनंतर अनेक राज्यांतून पेपरफुटी आणि गैरप्रकारांच्या तक्रारी समोर आल्या होत्या. सध्या नाशिकमध्ये गैरप्रकाराचे केंद्र ग्राह्य धरले जात असले तरी गडचिरोलीमधूनही पेपर लिक झाल्याची माहिती पुढे आली होती. केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर एनटीएने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. आता ही परीक्षा पुन्हा घेतली जाणार असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपविण्यात आल्याची माहिती आहे.

## ७३ प्रकरणांतील वादग्रस्त जमिनी सरकारजमा; १० कोटींचे नुकसान

अमरावती (दै. संध्या)

वरुड आणि मोर्शी तालुक्यातील जमिनींच्या सत्ता प्रकारात फेरफार करून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडवणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांनी आता कारवाईचा बडगा उगारला आहे. नऊ तत्कालीन तहसीलदार आणि नायब तहसीलदारांनी अधिकारांचा गैरवापर करून 'भोगवटादार वर्ग-२' च्या जमिनी नियमबाह्यरीत्या 'वर्ग-१' मध्ये परिवर्तित केल्याचे ७३ प्रकरणांत स्पष्ट झाले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी हे नियमबाह्य आदेश रद्द करून जमिनी पुन्हा 'वर्ग-२' मध्ये परिवर्तित करण्याचे आदेश दिले आहेत. मोर्शी उपविभागीय अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत धक्कादायक वास्तव समोर आले आहे. कायद्यानुसार जमिनीचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्याचे किंवा शर्तभंग नियमानुकूल करण्याचे अधिकार केवळ जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाकडे आहेत. मात्र, मोर्शी आणि वरुडमध्ये कार्यरत असलेल्या नऊ तहसीलदारांनी आपल्या अधिकारांच्या कक्षेबाहेर जाऊन ७३ प्रकरणांमध्ये जमिनींचे सत्ता प्रकार बदलले.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, आता या सर्व ७३ प्रकरणांमधील फेरफार स्वतःहून 'रिव्हिजन' मध्ये घेतले जाणार आहेत. तहसीलदारांनी दिलेले ते आदेश तातडीने रद्द करून शासकीय अभिलेखात या जमिनी पुन्हा भोगवटादार वर्ग-२' म्हणून नोंदवल्या जातील. या प्रक्रियेत दोषी असलेल्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करून अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याने दोषी महसूल अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

## 'गंगा माई की बेटियाँ' मधील शिझान खान सांगत आहे की कसा सिद्धूचा शांत त्याग त्याला टीव्हीवरील सर्वांत सन्माननीय प्रियकर बनवतो!

मुंबई (दै. संध्या)

झी टीव्हीवरील 'गंगा माई की बेटियाँ' या मालिकेत प्रमुख भूमिकेत शिझान खान (सिद्धू) आणि अमनदीप सिधू (स्नेहा) दिसत आहेत. भावनिक आणि मनोरंजक कथेमुळे ही मालिका सध्या प्रेक्षकांची मने जिंकत आहे. आगामी भागात प्रेक्षकांना दिसेल की इंदू राणी (श्रद्धा जयस्वाल) सिद्धू आणि स्नेहाला जाळ्यात अडकवण्यासाठी त्यांना एका खोलीत बंद करते. तिचा हेतू स्नेहाची प्रतिमा मलिन करणे आणि शंतनू (शहजाद शेख) सोबत ठरलेले तिचे लग्न मोडणे हा असतो. तिचा असा डाव असतो की सकाळी गावकरी आल्यावर त्यांना वाटेल की सिद्धू आणि स्नेहा दोघे रात्रभर एकत्र होते. मात्र, अशा वेळेस स्वतःचे प्रेम मिळवण्याची संधी असूनही सिद्धू वेगळाच निर्णय घेतो. दार



उघडण्यापूर्वी तो शांतपणे स्वतःला लपवतो, जेणेकरून तो स्नेहासोबत खोलीत होता हे कोणालाही कळणार नाही. हा प्रसंग सुंदरपणे दाखवतो की सिद्धूसाठी स्नेहाचा सन्मान, शांतता आणि आनंद हे त्याच्या स्वतःच्या भावनांपेक्षा आणि प्रेमकथेपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

सिद्धूची भूमिका साकारणारा शिझान खान म्हणाला, "माझ्या मते सिद्धू हा नेहमीच्या टीव्हीवरील नायकांपेक्षा वेगळा आहे कारण त्याचे प्रेम निःस्वार्थीपणा, आदर आणि मर्यादा समजून घेण्यावर आधारलेले आहे. त्याची व्यक्तिरेखा अशा एका दुर्मिळ पुरुषाची आहे, ज्याला समजते की प्रेम म्हणजे कोणावर हक्क गाजवणे किंवा त्यांना परत मिळवणे नव्हे, तर त्या व्यक्तीची शांतता, सन्मान आणि आनंद जपणे हे आहे. ज्याक्षणी सिद्धूकडे स्नेहाला पुन्हा आयुष्यात आणण्याची संधी होती, त्या वेळीही तो स्वतःच्या भावनांपेक्षा तिच्या भल्याला प्राधान्य देतो आणि शांतपणे मागे हटतो. माझ्यासाठी सिद्धूचा हा निःशब्द त्यागच त्याला टीव्हीवरील सर्वांत आदरणीय प्रियकर बनवतो. जरी आपल्या स्वतःच्या प्रेमकथेवर परिणाम झाला तरी खरे प्रेम म्हणजे संरक्षण, आदर आणि आपण ज्या व्यक्तीवर प्रेम करतो तिच्यासाठी सर्वोत्तमच विचार करणे असल्याचे तो सिद्ध करतो."

आता जसजशी स्नेहा आणि शंतनूच्या लग्नाची तारीख जवळ येत आहे, तसतसे प्रेक्षक उत्सुकतेने वाट पाहत आहेत की हे लग्न खरोखर पार पडेल की नशिबाने अजून काही वेगळा खेळ आखला आहे. काय सिद्धू-स्नेहाच्या प्रेमकथेला नवीन वळण मिळेल..



# जेजुरीत येणाऱ्या भाविकांना वाहन प्रवेश करातून सूट द्या

## मनसेचे नगरपरिषदेला साकडे

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडेरायाच्या देवदर्शन व कुलधर्म कुलाचारासाठी जेजुरीत येणाऱ्या भाविकांना वाहन प्रवेश करातून मुक्त करा तसेच नगरपरिषदेकडून देण्यात येणारा वाहन प्रवेश कर ठेका रद्द करावा अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष उमेश जगताप ,शहराध्यक्ष गणेश कुंभार यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांचेकडे पत्राद्वारे केली आहे.

कुलदैवत खंडेराया हे बहुजन बांधवांचा लोकदेव असून राज्याच्या विविध प्रांतातून सर्व स्तरातील भाविक लाडक्या कुलदैवताचे देवदर्शन व कुलधर्म कुळाचारासाठी दाखल होतात .त्यांच्याकडून वाहन प्रवेश करापोटी ६० ते १०० रुपये वसूल केले जातात . ही वसुली होत असताना भाविकांना सोयी सुविधा देण्यात नगरपरिषद प्रशासन अपुरी पडत आहे .भाविकांना खाजगी वाहन तळाचा आश्रय घ्यावा लागतो.तेथे वेगळी पदरमोड करावी लागते .हार ,फुले ,प्रसाद ,भंडारा खोबरे ,पूजेचे साहित्य खरेदीनंतर भाविक गडावर पोहोचल्यानंतर दर्शनासाठी भाविकांची गर्दी असेल तर झटपट दर्शनासाठी भाविकांना १००/२००रुपयांचा दर्शन पास घ्यावा लागतो. त्यानंतर विविध धार्मिक कार्य व दानधर्म वेगळा त्यातच पुणे -पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर तक्रारवाडी फाटा येथे बेलसर टोलप्लाझा सुरू झाला असून तेथेही भाविकांना टोल द्यावा लागतो . तसेच कऱ्हा नदीवर देव कार्यासाठी जाताना तिथे ही वेगळा खासगी वाहनकर भरावा लागतो एकूणच भाविकांना देवदर्शन महाग झाले असून नगरपरिषदेकडून वसूल करण्यात येणारा वाहन प्रवेश कर रद्द करून भाविकांना दिलासा द्यावा अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

### वाहन तळ निर्माण करणार : मुख्याधिकारी इंगुले

जेजुरी नगरपरिषदेकडून भाविकांच्या वाहनांसाठी शहरातील बंगाली पटांगण व नवीन पालखी तळ असे दोन ठिकाणी वाहन तळ निर्माण करण्याचे धोरण आहे.नगरपरिषदेच्या पुढील स्थायी समितीच्या सभेत हा विषय मंजूर करून घेण्याचा प्रयत्न राहील. पालखी तळाबाबत जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पस्ताव सादर करणार आहोत .पुढील काळात वाहन प्रवेश कर वसूल करताना मोफत वाहन तळ देण्याची सुविधा निर्माण होणार असल्याचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी यावेळी आश्वासन दिले.

# घनश्याम पाटील यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

सडेतोड पत्रकारिता, वैचारिक लेखन आणि सर्जनशील साहित्यनिर्मितीद्वारे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल चपराक प्रकाशनचे संचालक आणि प्रकाशक घनश्याम पाटील यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला. बारामती येथील सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले पुस्तक जत्रेत उद्योजक राजेंद्र पवार, युवा नेते आणि विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सतीश खोमणे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवींद्र टकले, बापूसाहेब लोखंडे, नवनाथ वळकुंदे, आर. मारकड आदी उपस्थित होते.



यावेळी युगेंद्र पवार म्हणाले, मोरोपंतांपासून बारामतीची साहित्य परंपरा मोठी आहे. 'चपराक'ने अनेक महत्त्वपूर्ण पुस्तकांची निर्मिती करून ती वाचकांसाठी उपलब्ध करून दिली आहेत. समाजात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रतिभावंतांचा गौरव केल्यास त्यांचे मनोधैर्य उंचावते. त्यामुळे घनश्याम पाटील यांना हा पुरस्कार देताना बारामतीकर म्हणून मला अभिमान वाटतो. केवळ वाचनाच्या सवयीमुळेच माझे माझ्या आजोबांसोबत खास नाते जुळले. आमच्यासारख्या वाचकांसाठी उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित करून घनश्याम पाटील यांनी आमची दर्जेदार वाचनाची भूक भागविली आहे.

> अनेक वैचारिक मतभेद असूनही गुणवत्तेची दखल घेत पवार कुटुंबीयांनी माझा गौरव केला. यातून त्यांची गुणग्राहकता दिसून येते. साहित्य आणि प्रकाशन क्षेत्रात मी खारीचा वाटा उचललाय. सामाजिक विकास प्रतिष्ठान बारामती यांनी मोठ्या आस्थेने माझ्या या कार्याची दखल घेऊन मला प्रोत्साहन दिले आहे. महात्मा जोतीराव फुले यांचे दोनशेवे जयंती वर्ष सुरू असतानाच सावित्रीमाईंच्या नावाने पुस्तक जत्रेचे आयोजन करणे आणि आमच्यासारख्या लोकांची त्यात दखल घेणे हा आमचा मोठा सन्मान आहे. यासाठी आयोजकांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.
>
> **- घनश्याम पाटील चपराक प्रकाशन**

रवींद्र टकले म्हणाले, गेल्या पंचवीस वर्षात घनश्याम पाटील यांनी मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. चपराकच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक विषयांवर निर्भिड भाष्य करत समाजप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य अव्याहतपणे सुरू ठेवले आहे. प्रतिथयश लेखकांबरोबरच नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देत अनेकांना साहित्याच्या मुख्य प्रवाहात आणण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. स्वतः निर्मितीक्षम लेखक असल्याने त्यांनी प्रकाशित केलेल्या साहित्याची विशेष दखल घेतली जाते. त्यामुळे आमच्या संस्थेतर्फे देण्यात येणारा पहिला समाजभूषण पुरस्कार त्यांना देताना आम्हाला आनंद आणि अभिमान वाटतो.

## भूमी वर्ल्ड इन्फ्रास्ट्रक्चरच्या अतिक्रमणाविरोधात भिवंडी खासदार सुरेश म्हात्रे आक्रमक

**भिवंडी (दै. संध्या)**

भिवंडी खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळा मामा म्हणाले की, मुंबई-नाशिक महामार्गावरील पिंपळा गावाच्या हद्दीत भूमी वर्ल्ड वेअरहाऊस कॉम्प्लेक्सच्या अनधिकृत बांधकामाविरोधात महसूल विभागाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही. त्यांनी असा आरोप केला की, या अनधिकृत बांधकामाला राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर संरक्षण दिले जात आहे. या राजकीय आणि प्रशासकीय प्रभावामुळे, ६ मे रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल करूनही एमएमआरडीए आणि जिल्हा प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही. खासदार म्हात्रे यांनी इशारा दिला की, जर प्रशासनाने पुढील दोन दिवसांत अनधिकृत बांधकाम प्रकरणात 'भूमी वर्ल्ड डेव्हलपमेंट'वर कारवाई केली नाही, तर स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने बांधकाम स्थळावर तीव्र आंदोलन केले जाईल. खासदार




सुरेश म्हात्रे, उर्फ बाळा मामा, यांनी बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले की, यासाठी एमएमआरडीए आणि जिल्हा प्रशासन पूर्णपणे जबाबदार असेल. तालुक्यात ठाणे-भिवंडी बायपास रस्त्यालगत असलेल्या पिंपळा गावाच्या हद्दीत, भूमी वर्ल्डचे डेव्हलपर प्रकाश पटेल यांनी सुमारे १ कोटी चौरस फूट बांधकाम केले आहे. हे बांधकाम २५ एकर सरकारी चराईच्या जमिनीवर तसेच शेतकऱ्यांच्या जमिनीवर करण्यात आल्याचा आरोप आहे. इतकेच नाही, तर मुख्य रस्त्यासमोर सुमारे ५.५ लाख चौरस फुटांचा १००% बेकायदेशीर मॉल बांधण्यात आला आहे. डेव्हलपरने या बांधकामासाठी कोणतीही परवानगी घेतलेली नाही. एमएमआरडीए प्रशासनाने माहिती अधिकार कायद्याअंतर्गत एका लेखी पत्राद्वारे खासदार सुरेश म्हात्रे यांना याची माहिती दिली आहे. खासदार म्हात्रे यांनी असा आरोप केला की, या बेकायदेशीर बांधकामांविरोधात २०१८, २०१९ आणि २०२१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमध्ये नवीन बांधकाम न करण्याचे आणि एमएमआरडीएला तात्काळ कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. असे असूनही, प्रशासन न्यायालयाचा अवमान करत आहे. त्यांनी सांगितले की, विकासकाला प्रशासकीय आणि राजकीय पाठबळ दिल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावरचे बेकायदेशीर बांधकाम अशक्य आहे. त्यामुळे, कारवाईची मागणी करत ते एमएमआरडीए आणि ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना अंतिम ईमेल पाठवतील. दोन दिवसांत कारवाई न झाल्यास, पुढील पंधरा दिवसांत स्थानिक शेतकऱ्यांसोबत बेकायदेशीर बांधकाम स्थळी तीव्र आंदोलन केले जाईल. त्या काळात कायदा आणि सुव्यवस्था बिघडल्यास, त्यासाठी प्रशासन पूर्णपणे जबाबदार असेल. या विकासकाला संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाईची मागणी केली जाईल, असे स्पष्टीकरण 'बाल्या मामा' म्हणून ओळखले जाणारे खासदार सुरेश म्हात्रे यांनी दिले.

> मला सध्या याबद्दल काहीही बोलायचे नाही. मी जे काही करत आहे ते भिवंडीच्या विकासासाठी आहे. राजकारणात असलेले लोक ते करत आहेत, तर मी विकासासाठी काम करत आहे. अधिक तपशील देण्यासाठी मी दोन दिवसांनी पत्रकार परिषद घेईन.
>
> **- प्रकाश पटेल - डेव्हलपर, भूमी वर्ल्ड वेअरहाऊस कॉम्प्लेक्स**

## 'शिव-शंभू कॉरिडॉर' विकसित करण्याच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

शिरूर लोकसभा मतदारसंघातील पर्यटनाला चालना देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला ते स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ असलेल्या वढु बुद्रुक दरम्यान 'शिव-शंभू कॉरिडॉर' विकसित करण्याच्या खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या मागणीला सार्वजनिक बांधकाम विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून प्रकल्प विभागाने तयार केलेला याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधीक्षक अभियंता, पुणे मंडळ यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात अनेक ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळे आहेत. ही सर्व ठिकाणे जोडणारा १० मीटर रूंदीचा 'शिव-शंभू कॉरिडॉर' विकसित करण्याच्या



मागणीचा पाठपुरावा खासदार डॉ. कोल्हे गेल्या ३-४ वर्षांपासून करीत होते. महामार्गाची लांबी वगळता सुमारे ६०.०० कि.मी. लांबीचा रस्ता १० मीटरने विकसित केल्यास शिवनेरीसह जुन्नर तालुक्यातील किल्ले व पर्यटन स्थळे, ओझर, लेण्याद्रि येथील अष्टविनायक गणपती मंदिर, लेणी समूह, त्याचबरोबर वाफगावचा ऐतिहासिक होळकरवाडा, पेशवेकालीन टाकसाळ, कनेरसरचे यमाई देवस्थान आणि वढु-तुळापूरचे छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ असा पर्यटनाला चालना देणारा 'कॉरिडॉर' तयार होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### जेजुरीत शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासन महसूल वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांच्या आदेशानुसार जेजुरी येथे शुक्रवार दिनांक 15 रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा 2 चे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्‌घाटन पुरंदर हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांच्या हस्ते होणार असून या प्रसंगी जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई उपनगराध्यक्ष गणेश निकुडे व सर्व नगरसेवक उपस्थित राहणार आहेत. या शिबिरात प्रलंबित असणारे फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती, लोकसेवा हक्क कायदा तात्काळ सेवा, अकृषक तरतूद मार्गदर्शन, ई मोजणी, पी एम किसान योजना, तक्रार निवारण प्रणाली, आरोग्य तपासणी, अभा कार्ड, आयुष्यमान कार्ड, वयोश्री कार्ड नोंदणी व वाटप, जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने जन्म मृत्यू दाखले, रेशकार्ड वरील नावे कमी करणे, नवीन नावे दाखल करणे, आधारकार्ड नोंदणी, दुरुस्ती आदी उपक्रमांचा समावेश आहे. या शिबिरात सर्व शासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन तहसीलदार विक्रम राजपूत यांनी केले आहे.

### किरकोळ वादातून तिघांवर प्राणघातक हल्ला; येलवाडी येथील प्रकार

चाकण (दैनिक संध्या) : चाकण औद्योगिक वसाहतीमधील दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील येलवाडी (ता. खेड) गावाजवळ हॉटेल इंद्रायणी समोरील मोकळ्या जागेत किरकोळ वादातून तिघांवर दांडके, विटा व लाथाबुक्क्यांनी प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. या मारहाणीत तिघेजण गंभीर जखमी झाल्याची माहिती महाळुंगे इंगळे एमआयडीसीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांनी दिली. तोहीत इनामदार, सार्थक पाडळे, आशिष माने व सिद्धार्थ लांघे (सर्व रा. देहुगाव, ता. हवेली, जि. पुणे) यांच्या विरोधात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाळुंगे पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार, आकाश ढेरंगे व प्रशांत जाधव यांच्यात किरकोळ वाद झाला होता. या वादाच्या कारणावरून वरील आरोपींनी संगनमत करून फिर्यादी आकाश ढेरंगे व प्रसाद म्हस्के यांच्यावर हल्ला केला. आरोपींनी लाकडी दांडके, विटा तसेच लाथाबुक्क्यांनी त्यांना बेदम मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादी आकाश याच्या डाव्या हाताच्या पोटरीला व उजव्या पायाच्या नडगीला फ्रॅक्चर झाले. तसेच आकाश यांच्या पाठीवर मार लागून डोक्याला गंभीर दुखापत झाली असून चार टाके पडले आहेत. प्रसाद म्हस्के यांच्या डाव्या पायालाही फ्रॅक्चर झाले आहे. मारहाणीनंतर आरोपींनी हातातील दांडके हवेत फिरवत “आम्ही येथील भाई आहोत, आमच्या नादाला लागू नका,” अशी धमकी देत परिसरात दहशत निर्माण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस पुढील तपास करत आहेत.

### थकबाकी न भरल्यास पथारी व्यावसायिक काळ्या यादीत; प्रशासनाचा इशारा

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महापालिकेने थकबाकीदार आणि परवाना नूतनीकरण न करणाऱ्या फेरीवाल्यांविरोधात कठोर भूमिका घेतली असून ३१ मेपूर्वी नूतनीकरण न केल्यास संबंधितांना काळ्या यादीत टाकून त्यांची व्यवसाय साधने जप्त करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे. तसेच अशा फेरीवाल्यांना पुढील पथविक्रेता सर्वेक्षणात सहभागी होता येणार नाही. महापालिका हद्दीत सुमारे २१ हजार नोंदणीकृत पथारी व्यावसायिक असून त्यापैकी १८०० हून अधिक व्यावसायिकांकडे परवाना शुल्काची थकबाकी आहे.

## राज्यातील ९९ टक्के वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज नाही

**पुणे (दै. संध्या)**

राज्यातील छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज हा अधिभार द्यावा लागणार असल्याचे चित्र काही हितसंबंधी गटांकडून निर्माण केले जात असून ते पूर्णपणे चुकीचे आहे. राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली. ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे. राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे.

## शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**बारामती (दै. संध्या)**

### अर्ज करण्याचे आवाहन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार व दिनांक २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील गरीब व गरजू कुटुंबांच्या निवासस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४० व ५१ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ४३, ४३(अ) व ५२ अंतर्गत विशिष्ट अटी व शर्तींनुसार दिनांक ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी स्वरूपाची अतिक्रमणे नियमित करण्यात येणार आहेत.

अतिक्रमणे नियमित करण्यासाठी पात्रता दिनांक ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वीची व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठीची अतिक्रमणेच नियमित करण्यासाठी पात्र राहतील. तसेच संबंधित वस्ती किंवा परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन गरजांसाठी असलेली किराणा दुकान, मेडिकल, दळणाची चक्की, छोटेखानी दवाखाना आदी स्वरूपाची अतिक्रमणे, अतिक्रमणधारकाच्या निवासस्थानास जोडलेली असल्यास अपवादात्मक परिस्थितीत नियमानुसार विचारात घेतली जाणार आहेत.

अतिक्रमण दिनांक ०१ जानेवारी २०११ पूर्वीचे असल्याचा पुरावा म्हणून मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती, निवासी पुराव्यासाठीचे इतर शासकीय दस्तऐवज (शिधापत्रिका वगळून), ग्रामपंचायतमधील आठ-अ उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना आदी पुरावे ग्राह्य धरले जातील. उपग्रह छायाचित्र देखील महत्त्वाचा पुरावा म्हणून मान्य करण्यात येणार आहे. याशिवाय, चालू वास्तव्यासंदर्भातील मागील एका वर्षातील शासकीय पुरावा सादर करणे आवश्यक राहील. असे उपविभागीय अधिकारी श्री. उत्तम दिघे यांनी स्पष्ट केले आहे.

सदर अतिक्रमण हे केवळ स्व-राहण्यासाठी (निवासी हेतूसाठी) केलेले असावे.व्यावसायिक वापरासाठीची अतिक्रमणे नियमित करण्यासाठी पात्र ठरणार नाहीत.

पात्र व्यक्तींनी (संस्था नव्हे) अतिक्रमण नियमित करण्यासाठी दिनांक ३० डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

ग्रामीण भागातील नागरिकांनी संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे अर्ज करावेत, तर नगरपालिका व नगरपंचायत हद्दीतील नागरिकांनी संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावेत.


निर्धारित मुदतीत अर्ज करणाऱ्या पात्र व्यक्तींना त्यांचे अतिक्रमण नियमित होईपर्यंत संरक्षण मिळणार आहे. मात्र,निर्धारित मुदतीनंतर अर्ज न करणाऱ्या अथवा अपात्र व्यक्ती/संस्थांची अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी श्री. दिघे यांनी सांगितले आहे.

# खेळाडूंच्या मिरवणूकीने व्हॉलीबॉल स्पर्धेचा जल्लोषात प्रारंभ

## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा 2026 : बदलापूरमधील पाहुणचाराने भारावले राज्यभरातील क्रीडापटू

**भिवंडी (दै. संध्या)**

ढोल-ताशाचा गजरात मराठमोळे फेटे परिधान करीत उत्साहपूर्ण मिरवणूकीने छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचा बदलापूर शहरात आज शानदार प्रारंभ झाला. डिजीटल वॉटर बॉटलने स्वागत, विद्युतप्रकाश झोतातील सामने, थेट प्रेक्षपणासह बदलापूरमधील पाहुणचाराने राज्यभरातील खेळाडू भारावून गेल्याचे दिसून आले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेला आजपासून दिमाखदार सुरूवात झाली. हेंद्रेपाडामधील बदलापूर जिमखाना मैदानावर रंगलेल्या स्पर्धेचा प्रारंभ खेळाडूंच्या



मिरवणूकीने करण्यात आला. बदलापूरमधील शिवशंभू वाद्य पथकाच्या जल्लोषात फेटे परिधान केलेल्या खेळाडूंची मिरवणूक लक्षवेधी ठरली. कुळगाव-बदलापूर नगरपरिषद माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, नगरसेवक किरण भोईर यांनी केले. यावेळी मुख्यधिकारी मारूती गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव निलेश जगताप व ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन पदाधिकारी उपस्थित होते.

बदलापूर जिमखानापासून सुरू झालेली मिरवणूक साई चौक, गणपती चौक मार्गे झेंडा चौकात आल्यानंतर क्रीडामय वातावरणात स्पर्धा स्थळी समाप्त झाली. दिड किमी अंतराच्या मिरवणूकीने हेंद्रेपाडा परिसर क्रीडामय झाल्याची अनुभुती उपस्थितींना आली. दुपारच्या सत्रात स्पर्धेतील सहभागी अमरावती, मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, कोल्हापूर विभागातील पार्श्वभूमीवर प्रशिक्षक व व्यवस्थापकांची बैठक पार पडली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मुंबई विभागाचे उपसंचालक नवनाथ फरताडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, नगरसेवक किरण भोईर, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव निलेश जगताप, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुवर्णा बारटक्के आदी मान्यवर उपस्थित होते. राज्यातील उत्कृष्ट व्हॉलीबॉल प्रतिभेचा संगम या स्पर्धेत पाहायला मिळणार असे किरण भोईर यांनी यावेळी सांगितले. आमदार किसन कथोरे यांच्या विशेष प्रयत्नांतून ही मानाची राज्यस्तरीय स्पर्धा प्रथमच अंबरनाथ बदलापूर परिसरात आयोजित करण्यात येत असून, त्यामुळे प्रथमच स्थानिक खेळाडू, क्रीडाप्रेमी व युवकांना राज्यस्तरीय दर्जाच्या स्पर्धेची पार्वणी पहाण्यास मिळाली आहे. 13 ते 17 मे 2026 कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेसाठी राज्यतील 8 विभागातील 384 खेळाडूंचा थरार रंगणार आहे.

### डिजीटल वॉटर बॉटलने भारावले खेळाडू

बदलापूरमधील राज्य व्हॉलीबॉल स्पर्धातील सहभागी सर्व 32 संघाच्या 384 खेळाडूंनी स्मरणीय भेटवस्तू देत स्वागत करण्यात आले. डिजीटल वॉटर बॉटलसह सॅक, कॅप आणि ओआरएसची पाकिटे खेळाडूंना देण्यात आली. तापमान दर्शविणाऱ्या डिजीटल वॉटर बॉटलने खेळाडू भारावून गेले होते. प्रथमच तापमान दर्शविणारी पाण्याची बाटली खेळाडूंच्या हाती आली होती. भर उन्हाळ्यात बदलापूरचे तापमान किती हे क्षणात खेळाडूंना समजून आले. तसेच उन्हापासून सरंक्षण होण्यासाठी ओआरएसची पाकिटे दिल्याने खेळाडू खुश असल्याचे दिसून येत होते.